# 9 राष्ट्रीय काँग्रेस व काँग्रेसचा कालखंड

## राष्ट्रवादाची व राष्ट्रीय सभेच्या उदयाची कारणे

- ब्रिटीशामुळे भारतात निर्माण झालेली एकता.
- पाश्चात्य शिक्षणाचा परिणाम.
- दळनवळनाच्या सुधारणामुळे एकात्मतेस हातभार.
- धर्मसुधारणा चळवळी - भारतीयात स्वाभिमानाची निर्मिती.
- समाजसुधारकांचे प्रयत्न
- वृत्तपत्राची समाजजागृती महत्त्वपूर्ण / कामगिरी.
- राष्ट्रीय साहित्य.
- हिंदू स्थानच्या प्राचीन संस्कृतिचे पाश्चात्य संशोधक.
- इंग्रजांनी केंद्रीकरणाची प्रखर भूमिका - राष्ट्रीय एकात्मतेस कारणीभूत.
- इंग्रजी भाषा.
- मध्यमवर्गीय सुशिक्षितांचा उदय - आर्थिक शोषणाबद्दल जागृती.
- तत्कालीन युरोपीय चळवळीचा भारतीयावर प्रभाव.
- लॉर्ड लिटनचे दडपशाही करणारे साम्राज्यवादी धोरण.
- इलबर्ट बिलवाद.

## राष्ट्रीय काँग्रेसपूर्वीच्या राजकीय-संस्था

| अ. | संस्था | संस्थापक | ठिकाण | स्थापना |
|---|---|---|---|---|
| 1. | जमीनदारी संस्था (लँडहोल्डर्स असोसिएशन) | द्वारकानाथ टागोर | कलकत्ता | 1837 |
| 2. | ब्रिटिश इंडिया सोसायटी, लंडन | विल्यम ॲडम | लंडन | 1839 |
| 3. | ब्रिटिश इंडिया सोसायटी, बंगाल | जॉर्ज थॉम्पसन | कलकत्ता | 1843 |
| 4. | मद्रास नेटिव्ह असोसिएशन | गझलू लक्ष्मीनरसू चेट्टी, सी.वाय. मुदलीयार | मद्रास | 1852 |
| 5. | ब्रिटिश इंडियन असोसिएशन | देवेंद्रनाथ टागोर | कलकत्ता | 1851 |
| 6. | बॉम्बे असोसिएशन | जगन्नाथ शंकरशेट, दादाभाई नौरोजी | मुंबई | 1852 |
| 7. | लंडन इंडियन सोसायटी | बद्रुद्दीन तय्यबजी, व्योमेशचंद्र बॅनर्जी दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता | लंडन | 1865 |
| 8. | ईस्ट इंडिया असोसिएशन | दादाभाई नौरोजी | लंडन | 1866 |
| 9. | नॅशनल इंडियन असोसिएशन | मेरी कार्पेंटर | लंडन | 1867 |
| 10. | पूना सार्वजनिक सभा | ग.वा. जोशी, म.गो. रानडे | पुणे | 1870 |
| 11. | इंडियन सोसायटी | आनंद मोहन बोस | लंडन | 1872 |
| 12. | इंडिया लीग | शिशिरकुमार घोष | कलकत्ता | 1875 |
| 13. | इंडियन असोसिएशन | सुरेंद्रनाथ बॅनर्जी, ए.एम. बोस | कलकत्ता | 1876 |
| 14. | नॅशनल कॉन्फरन्स | सुरेंद्रनाथ बॅनर्जी | कलकत्ता | 1883 |
| 15. | मद्रास महाजन सभा | रामस्वामी, एम. राघवाचारी, सुब्रह्मण्यम अय्यर, आनंदा चार्लू | मद्रास | 1884 |
| 16. | बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन | फिरोजशहा मेहता, के.टी. तेलंग, बद्रुद्दीन तय्यबजी | बॉम्बे | 1885 |

## राष्ट्रीय कॉंग्रेसची पार्श्वभूमी

- भातात अनेक छोट्या-मोठ्या संघटना तयार झाल्या होत्या अशा सटरफटर संघटनेपेक्षा एक मोठी संघटना निर्माण होण्याची गरज (ब्रिटीशावर प्रभाव टाकण्यासाठी)

↓

- सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी 1883 ला कलकत्ता येथे अखिल भारतीय परिषद भरवली (AINC-1883)

↓

- देशव्यापी संघटनेचे महत्त्व कळाले.

↓

- 1884 थिऑसॉफिकल सोसायटीच्या 1884 च्या अडयार अधिवेशनात सुरेंद्रनाथ बॅनर्जी व दादाभाई नौरोजी यांनी देशव्यापी संघटनेचे प्रतिपादन केले.

↓

- दिवाण रघूनाथराव बहादूर यांच्या घरी बैठक बोलवण्यात आली. येथे मद्रास महाजन सभा, बॉम्बे प्रेसडेन्सी असोसिएशन सदस्य उपस्थित होते.

↓

- लॉर्ड लिटन कारणीभूत (जे उद्दिष्ट्य कित्येक वर्षाच्या आंदोलनाने साध्य झाले नाही ते लिटनच्या चार वर्षाच्या आत्यंतिक प्रतिगामी शासनाच्या काळात साध्य झाले - सुरेंद्रनाथ बॅनर्जी)

## सर ॲलन ह्यूमचे योगदान

- भारतीय लोकांविषयी तळमळ, प्रशासनात भारतीयानी सहभागी व्हावे, भारतीयांना सन्मान मिळावा.

↓

- भारतीयात इंग्रजाविरुद्धचा असंतोष कमी करावा. सर वेडनबर्ग व हेन्री कॉटन यांची साथ.

↓

- वेडनबर्ग यांनी बळवंत फडके यांचा उठाव पाहिला होता त्यांच्या मते तलवारीच्या जोरावर म्हणजेच दडपशाहीच्या मार्गाने या देशावर दीर्घकाळ राज्य करता येणार नाही. (इंग्रजांनी भूमीका बदलावी.) लॉर्ड डफरीनची भेट, डफरीनने सर्व अधिकार व स्वातंत्र्य दिले.

↓

- 1883 साली ह्यूमने कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना प्रयत्न (वयक्तिक स्वार्थ, उन्नती, मोह सोडून देशहितासाठी हिंदी तरुणांनी एकत्र यावे, राजकीय जागृती व देशहिताचे कार्य भारतीयांना करावे लागणार आहे.)

↓

- असंघटीत लोक कितीही बुद्धीमान असले व उच्च आदर्श बाळगणारे असले तरी एकाकी अवस्थेत ते दुर्बल असतात म्हणुन त्यांनी 50 स्वयंसेवकाची मागणी केली.


↓

- 1884 मध्ये ह्यूम यांनी इंडियन नॅशनल युनियनची स्थापना केली. एका वर्षात सुरत, कराची, अहमदाबाद, मुंबई, अलाहाबाद, बनारस इत्यादी ठिकाणी शाखा स्थापन.

↓

- 1884 ला इंग्लंडमध्ये जाऊन रिपन, नॉर्थबूक, जॉन ब्राईट यांची भेट घेतली.

### ए.ओ. ह्युम



- जन्म - 6 जुन, 1829. मृत्यू - 31 जुलै, 1912
- पूर्ण नाव - ॲलन ऑक्टेव्हियन ह्युम
- ओळख - राष्ट्रीय कॉंग्रेस संस्थापक
- 1849 इटावा (उत्तरप्रदेश) जिल्ह्यात कलेक्टर 1857 मध्ये येथेच कार्यरत होते.
- मित्र - दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, व्योमेशचंद्र बॅनर्जी, लोकमान्य टिळक.
- दररोज भगवत गिता व बायबल चे वाचन.
- 1882 मध्ये निवृत्त.

**ह्युम यांनी भूषविलेले पदे**

कलेक्टर (1849-1857)
पंजाबचे ले. गव्हर्नर, पंजाबच्या गव्हर्नरचे सेक्रेटरी
न्यायाधीश, गृहसचिव (1870-79)

# काँग्रेसचे अधिवेशने

**सुरक्षा झडप**

- ब्रिटीश साम्राज्य अधिक सदृढ बनवणे.

↓

- हिंदुस्थानात निर्माण झालेल्या राष्ट्रवादाला शस्त्राच्या बळावर दडपणे.

↓

- डफरीनने क्रांतीकारी विचारांना जागच्याजागी जिरवण्यासाठी सुरक्षा झडप सिद्धांत ह्यूम मार्फत रुजवला.

↓

- काँग्रेसने इंग्लंडमधील विरोधी पक्षासाखे काम करावे, जनतेच्या मागण्या सरकारपर्यंत पोंहचवाव्या.

↓

- यंत्रातील वाफ सुरक्षा झडपेप्रमाणे बाहेर काढायची होती, जेणेकरुन इंग्रजी राजवट सुरक्षीत राहील. (Sefty Valve)

↓

- ह्यूम यांना INC च्या नेत्यांचा वापर सुरक्षा झडप म्हणुन तर राष्ट्रसभेच्या नेत्यांना त्यांचा वापर एका विद्युत वाहकासारखा करावयाचा होता.

## राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना व अधिवेशने

### 1 ले अधिवेशन 1885

- **ठिकाण -** मुंबई (**गोकुळदास तेजपाल संस्कृत महाविद्यालय**)
- **अध्यक्ष -** व्योमेशचंद्र बॅनर्जी (कलकत्ता हायकोर्टाचे बॅरिस्टर / नखशिखांत इंग्रज)
- **सदस्य संख्या -** 72
- मुस्लीम प्रतिनिधी - 02. 1) आर.एम. सयानी, 2) ए.एम. धरमसी
- पहिले अधिवेशन **पुणे** येथे होणार होते (जबाबदारी सार्वजनिक सभा - 8 डिसेंबर 1885 च्या 'केसरी'त बातमी प्रकाशित करण्यात आली होती.) परंतु पुण्यात पसरलेल्या प्लेगच्या साथीमुळे हे अधिवेशन **मुंबई येथे** घेण्यात आले. (जबाबदारी बॉम्बे प्रसेडिन्सी असोसिएशन - 1885)
- मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड रे अध्यक्ष होणार होते.
- 12 पत्रकार उपस्थित होते.
- 9 ठराव पास करण्यात आले होते.

1) भारतीय प्रशानाच्या कार्याची चौकशीसाठी रॉयल कमिशन नेमणे.
2) भारतमंत्र्याची इंडिया कौन्सिल रद्द करणे.
3) ब्रह्मदेश व भारताचे एकीकरण करु नये.
4) प्रांतीय व केंद्रीय विधिमंडळात लोकप्रितिनिधी संख्या वाढवणे.
5) मिठावरील कर रद्द करणे.
6) ICS परीक्षा इंग्लंडप्रमाणे भारतात घेण्यात याव्यात. वयोमर्यादा 23 असावी.
७) लष्करी खर्च कमी करावा.
८) भारतीय वस्तुंसाठी संरक्षण मिळेल असे धोरण ठरवावे.
९) शेतकऱ्यांच्या करांचा बोजा कमी करावा..

- **पहिल्या अधिवेशनात उपस्थित इतर प्रांतातील प्रतिनिधी -** मोतीलाल नेहरु, गंगाप्रसाद वर्मा, गिरजा भूषण मुखर्जी (संयुक्त प्रांत), रंगय्या नायडू, जी. सुब्रमण्यम अय्यर, वीर राघवाचार्य, आनंद चार्लू (मद्रास), लाला मुरलीधर (पंजाब).

- **पहिल्या अधिवेशनात महाराष्ट्रातील उपस्थित प्रतिनिधी** -

| | |
|---|---|
| 1. दादाभाई नौरोजी | 2. फिरोजशहा मेहता |
| 3. कृष्णाजी नूलकर | 4. शिवराम हरी साठे |
| 5. वामन शिवराम आपटे | 6. रामचंद्र मोरेश्वर साने |
| 7. गंगाराम मस्के | 8. गोपालकृष्ण गोखले |
| 9. काशीनाथ त्र्यंबक तेलंग | 10.दिनशा वॉच्छा |
| 11. नारायण गणेश चंदावरकर | 12.रहिमतुल्ला सहानी |
| 13. सीताराम हरी चिपळूणकर | 14.गोपाळ गणेश आगरकर |
| 15. रा.गो. भांडारकर | 16.न्या. महादेव गोविंद रानडे |

- **पहिल्या अधिवेशनात युरोपीयन उपस्थित प्रतिनिधी** विल्यम वेडरबर्ण, युल नॉटर्न, हेन्री कॉटन, ॲलन ह्युम.

### राष्ट्रीय सभेची उद्दिष्ट्ये

- सरकारी ब्रिटीश अधिकारी आणि हिंदुस्थानातील सुशिक्षित लोक यांच्यात विचार विनिमय करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ करणे.
- हिंदुस्थानातील विविध जमाती, विविध वंश, रंगाचे लोक यांच्यातील भेदभाव नष्ट करणे.
- रिपनच्या उदारमतवादी कल्पनांचा पाठपुरवठा करणे.
- भारतातील सुशिक्षित लोकांच्या मताचा आदर करुन त्यांच्या मागणीचा पाठपुरवठा करणे.

### राष्ट्रीय काँग्रेस बद्दल वृत्तपत्रांची भूमिका

- **इंदूप्रकाश -** काँग्रेसच्या या पहिल्या अधिवेशनामुळे भारताच्या राजकीय जीवनात एका नवीन युगाला प्रारंभ झाला.

- **इंडियन मिरर -** मुंबईचे हे अधिवेशन भारतीयांच्या राजकीय जीवनातील एक क्रांतीकारक पाऊल समजले पाहिजे, यानंतर काँग्रेस मार्फतच निरनिराळ्या चळवळी होणार ही गोष्ट आज स्पष्ट झाली.
- **हिंदू -** हिंदूस्थानातील सुशिक्षित वर्ग हा हळूहळू जागृत होत ओ असेच या अधिवेशनावरुन दिसून येते.

## 2 रे अधिवेशन 1886

- **ठिकाण -** कलकत्ता
- **अध्यक्ष -** दादाभाई नौरोजी (पहिले पारशी अध्यक्ष)
- **स्वागताध्यक्ष -** डॉ. राजेंद्र मित्र
- **सदस्य संख्या -** 440/436 (महाराष्ट्र - 47)
- सुरेंद्रनाथ बॅनर्जी - इंडियन असोसिएशन व नॅशनल कॉन्फरन्स ही संघटना काँग्रेसमध्ये विलीन.
- लॉर्ड डफरीन - काँग्रेस नेत्यांना 'गार्डन पार्टी' दिली.
- सभेत 15 प्रस्ताव मंजूर करण्यात आले.
- दादाभाई नौरोजी यांनी 1858 च्या जाहीरनाम्याचा अभिनंदपर ठराव मांडला.
- राणी व्हिक्टोरियाच्या दीर्घ आयुष्यासाठी प्रार्थना करुन तिच्या नावाचा तीन वेळा जयजयकार करण्यात आला होता.
- काँग्रेस स्टॅंडिंग कमिटीची स्थापना.

## 3 रे अधिवेशन 1887

- **ठिकाण** - मद्रास
- **अध्यक्ष** - बद्रुद्दीन तैय्यबजी (पहिले मुस्लीम अध्यक्ष)
- **स्वागताध्यक्ष - राजा सर टी माधवराव**
- **सदस्य संख्या** - 610 (महाराष्ट्र - 112)
- आयोजनासाठी भिन्न धार्मियांची स्वागत समिती स्थापन
- रानडे - राजकीय कार्यावर नाराज होते.
- त्यांनी सामाजिक परिषदा/औद्योगिक परीषदा भरवल्या जाव्यात विचार मांडला.
- 1887 - 1 ली सामाजिक परिषद - मद्रासला घेतली.
- या अधिवेशनात एकुण 11 प्रस्ताव मंजूर करण्यात आले.
- तय्यबजी यांनी काँग्रेस कार्यपद्धतीसाठी विषय समिती सुचवली.
- आर्म्स ॲक्टचा निषेध केला.
- मद्रास प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड कॉनेमारा यांनी काँग्रेस सदस्यांना मेजवानी दिली.

## 4 थे अधिवेशन 1888

- **ठिकाण** - अलाहाबाद
- **अध्यक्ष** - जॉर्ज युल (व्यापारी/ पहिले ब्रिटिश व्यक्ती)
- **स्वागताध्यक्ष** - पं. अयोध्यानाथ
- **सदस्य संख्या** - 1248/1284 (मुस्लीम सदस्य संख्या - 200) (महाराष्ट्र - 236)
- या अधिवेशनाला जागा मिळू नये यासाठी सरकारने प्रयत्न केले.
- दरभंग्याच्या लच्छमेश्वर सिंह महाराजांनी गव्हर्नरच्या प्रसादाजवळ लाऊथरदुर्ग ही जागा विकत घेतली.
- सर सय्यद अहमद खान यांनी मुस्लीमांनी अधिवेशनास हजर राहू नये यासाठी प्रयत्न केले.
- सर सय्यद अहमद खान आणि राजा शिवप्रसाद यांनी युनाइटेड इंडिया पेट्रोयोअीक असोसिएशन ची स्थापना केली.
- शेख रजा हुसेन खान यांनी मुसलमानांना काँग्रेसच्या सोबत राहण्याचे आवाहन केले.
- या अधिवेशनात - हुसेन खान यांनी फतवा काढून काँग्रेसला सुन्नी गटांचा पाठिंबा असल्याचे जाहीर केले.
- डफरीनने काँग्रेसवर टीका 'अतिअल्पसंख्यांकाचे प्रतिनिधित्व करणारी संघटना'
  (काँग्रेसच्या मागण्या म्हणजे अंधारात उडी - डफरीन)
- प्रथमच लाला लजपतराय अधिवेशनाला उपस्थित - हिंदीतून भाषण केले.
- या अधिवेशनाला जागा मिळू नये म्हणून प्रयत्न (गव्हर्नर काल्विन/ डफरीन)
- याच अधिवेशनानंतर ब्रिटीशांना भारतीयांच्या मागणीची माहिती देण्यासाठी जुलै 1889 मध्ये INC ची शाखा लंडन मध्ये स्थापन केली. **अध्यक्ष -** वेडरबर्न, **सचिव -** विल्यम डिग्बी.

## 5 वे अधिवेशन 1889

- **ठिकाण** - मुंबई
- **अध्यक्ष** - विल्यम वेडरबर्न
- **स्वागताध्यक्ष** - सर फिरोजशहा मेहता
- **सदस्य संख्या** - 1889 (महाराष्ट्र - 1035)
- कारण याने हिंदी लोकांना कायदेमंडळात अधिकार द्या असे विधेयक बी.पी. मध्ये मांडले.
- या अधिवेशनात पहिल्यांदाच महिलांनी सहभाग घेतला.
  10 - महिला
- पंडिता रामाबाई
- रामाबाई रानडे, काशिबाई कानिटकर (महाराष्ट्र)

- शेवंतीबाई त्रिंबक
- शांताबाई निकंबे
- या अधिवेशनात एकुण 15 प्रस्ताव मंजूर करण्यात आले.
- मुंबई येथे भरलेले दुसरे अधिवेशन.
- सर विलियम वेडरबर्न यांनी ह्युमचे चरित्र लिहिले.
- वेडरबर्न यांनी आपल्या पेन्शनमधील 2000 पौंड काँग्रेसच्या कार्यासाठी दिली.
- 21 वर्षीय लोकांना मतदान अधिकार मिळाला पाहिजे हा ठराव पास केला.
- इंग्लंडमधील उदारमतवादी संसदीय नेता चार्ल्स ब्रॅडला यांचा सत्कार
- राजकीय हक्काची पहिली योजना तयार केली.
- काँग्रेसच्या अधिवेशनात प्रथमच लो. टिळकांची उपस्थिती

## 6 वे अधिवेशन 1890

- **ठिकाण** - कलकत्ता
- **अध्यक्ष** - फिरोजशहा मेहता
- **स्वागताध्यक्ष** - मनमोहन घोष
- **सदस्य संख्या** - 677
- कलकत्ता विद्यापीठाच्या पहिल्या महिला पदवीधर कंदबिनी गांगुली

या अधिवेशनात एकुण 15 प्रस्ताव मंजूर करण्यात आले.

- कलकत्ता येथे भरलेले दुसरे अधिवेशन.
- स्नातक कादम्बिनी गांगुली यांची उपस्थिती.
- अफगान युद्धाविषयी ठराव.
- प्रांताबाहेरील अध्यक्ष निवडण्याची परंपरा सुरु.
- सरकारी व्यक्ती/अधिकारी उपस्थित राहू नये. (रानडेंची कुचंबना)
- या धोरणाचा निषेध करण्यात आला.
- महात्मा फुले यांनी अधिवेशनाच्या प्रवेशद्वाराजवळ शेतकऱ्याचा गवताचा पुतळा उभारला.
- राष्ट्रीय सभेची ब्रिटीश समिती स्थापन - युल, ह्युम, ॲडम्स्, नॉरटॉन, हॉवर्ड.

## 7 वे अधिवेशन 1891

- **ठिकाण** - नागपूर
- **अध्यक्ष** - पी. आनंद चार्लू
- **स्वागताध्यक्ष** - सी. नारायण स्वामी नायड
- **सदस्य संख्या** - 1812
- पी. आनंद चार्लू हे काँग्रेसचे पहिले हिंदू अध्यक्ष होते.
- 18 प्रस्ताव मंजूर करण्यात आले.
- नागपूर येथे भरलेले पहिले अधिवेशन.
- काँग्रेसच्या नावात राष्ट्रीय शब्दाचा समावेश.
- राष्ट्रीयकरण करणारी शक्तीशाली संस्था म्हणुन उदय.
- पुढचे अधिवेशन इंग्लंडमध्ये भरावे असा ठराव मांडला. (1000 प्रतिनिधी)
- लाला मुरलीधर यांनी प्रथमच परदेशी मालाचा निषेध करणारे वक्तव्य केले.

## 8 वे अधिवेशन 1892

- **ठिकाण** - अलाहाबाद
- **अध्यक्ष** - व्योमेशचंद्र बॅनर्जी
- **सदस्य संख्या** - 625
- अलाहाबाद येथे भरलेले दुसरे अधिवेशन.
- 22 ठराव पास. ब्रिटीश पार्लमेंटमध्ये नौरोजी यांच्या निवडीवर अभिनंदन ठराव.
- काँग्रेसने लोकजागृती चळवळ हाती घ्यावी - ह्युम.
- भारतातून व इतर प्रांतातून त्यावर टिका.
- लोकमान्य टिळकांनी पाठींबा दिला. (आमचा भित्रापणा कसा झाकावा आम्ही शिकलो आहेत.)

## 9 वे अधिवेशन 1893

- **ठिकाण** - लाहोर
- **अध्यक्ष** - दादाभाई नौरोजी
- **सदस्य संख्या** - 867
- 23 ठराव मंजूर.
- हिंदूस्थानच्या दारिद्र्याचे वर्णन प्रथम अधिवेशनात करण्यात आले.
- सिव्हील सर्व्हीस परीक्षा भारतात झाल्या पाहिजेत असे मत मांडले.

## 10 वे अधिवेशन 1894

- **ठिकाण** - मद्रास
- **अध्यक्ष** - अल्फ्रेड वेब (आयर्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्स सदस्य)
- **स्वागताध्यक्ष** - पी. रंगय्या नायडू
- **सदस्य संख्या** - 1163
- 27 प्रस्ताव मंजूर करण्यात आले.
- मद्रास येथे भरलेले दुसरे अधिवेशन.
- वर्तमानपत्राचे स्वातंत्र्य, पाणीपट्टी वाढ यावर चर्चा करण्यात आली.

## 11 वे अधिवेशन 1895

- **ठिकाण** - पुणे
- **अध्यक्ष** - सुरेंद्रनाथ बॅनर्जी
- **स्वागताध्यक्ष** - व्ही.एम. भेंडे
- **सदस्य संख्या** - 1584
- 24 ठराव मांडले.
- राष्ट्रीय काँग्रेसची घटना तयार केली.
- सामाजिक परिषदेचे अधिवेशन बंद करण्यात आले.

## 12 वे अधिवेशन 1896

- **ठिकाण** - कलकत्ता.
- **अध्यक्ष** - रहीमतुल्ला सयांनी
- **सदस्य संख्या** - 784
- 22 ठराव पास केले.
- आसाममधील चहाच्या मळ्यातील मजुराचा होणारा छळ यावर चर्चा.
- आर्थिक सबलीकरणावर चर्चा. दा.नौ. यांच्या सिद्धांतास स्विकृती.
- वंदे मातरम हे गीत प्रथम गायले.

## 13 वे अधिवेशन 1897

- **ठिकाण** - अमरावती.
- **अध्यक्ष** - सी. शंकरननायर
- **स्वागताध्यक्ष** - दादासाहेब खापर्डे
- **सदस्य संख्या** - 692
- 23 ठराव पास.
- लो. टिळकांना अटक केली म्हणुन अटकेचा निषेध केला.

## 14 वे अधिवेशन 1898

- **ठिकाण** - मद्रास
- **अध्यक्ष** - आनंदमोहन बोस (सुशिक्षित वर्ग इंग्रजांचा शत्रू नसून त्यांचा नैसर्गिक सहकारी आहे.)
- **सदस्य संख्या** - 614
- कर्झनच्या स्वागताचा ठराव मांडला.
- सामाजिक सुधारणा हे 'आएनसी' चे मुख्य ध्येय असेल, असे घोषित केले.

## 15 वे अधिवेशन 1899

- **ठिकाण** - लखनौ.
- **अध्यक्ष** - रमेशचंद्र दत्त (आय.सी.एस.)
- मुस्लीम सदस्यांची संख्या जास्त होती.
- राष्ट्रीय काँग्रेसची घटना या अधिवेशनात मंजूर.
- 45 सदस्याची इंडियन काँग्रेस कमिटी स्थापन यापैकी 40 प्रांतीक सदस्य.

## 16 वे अधिवेशन 1900

- **ठिकाण** - लाहोर
- **अध्यक्ष** - नारायण गणेश चंदावरकर (पहिले मराठी अध्यक्ष)
- **स्वागताध्यक्ष** - राम काली प्रसन्न राय बहादूर
- **सदस्य संख्या** - 567
- या अधिवेशनात काँग्रेसच्या संविधान **नवीन संशोधन** करण्याचा ठराव पास करण्यात आला.

## 17 वे अधिवेशन 1901

- **ठिकाण** - कोलकत्ता
- **अध्यक्ष** - दिनेश शहा वाच्छा (1896 ते 1913 काँग्रेसचे महासचिव)
- **सदस्य संख्या** - 896
- महात्मा गांधी अधिवेशनाला प्रथम उपस्थित राहिले होते.
- वंदे मातरम् दखिना चरण यांनी मांडले.

## 18 वे अधिवेशन 1902

- **ठिकाण** - अहमदाबाद.
- **अध्यक्ष** - सुरेंद्रनाथ बॅनर्जी
- **स्वागताध्यक्ष** - दिवास बहादुर अंबालाल शंकरलाल देसाई
- **सदस्य संख्या** - 471
- सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे दुसऱ्यांदा काँग्रेसचे अध्यक्ष झाले.

## 19 वे अधिवेशन 1903

- **ठिकाण** - अहमदाबाद
- **अध्यक्ष** - लालमोहन घोष
- **सदस्य संख्या** - 538

## 20 वे अधिवेशन 1904

- **ठिकाण** - मुंबई
- **अध्यक्ष** - हेन्री कॉटन
- **सदस्य संख्या** - 1000
- बॅ. जीना प्रथमच अधिवेशनात सहभागी

## 21 वे अधिवेशन 1905

- **ठिकाण** - वाराणसी
- **अध्यक्ष** - गोपाळ कृष्ण गोखले
- **स्वागताध्यक्ष** - मुंशी माधव लाल
- 23 ठराव पास.
- बंगालच्या फाळणीला विरोध.
- स्वदेशी आंदोलनाला पाठिंबा

- इंग्लंडमधील कन्झरवेन्टीक पार्टीकडून मजूर पार्टीकडे सत्ता हंस्तातरण.
- वसाहतीच्या स्वराज्याची सर्वप्रथम मागणी करण्यात आली.
- बंगालच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन भरले होते. गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन यांच्या नितीवर तीव्र प्रक्षोभ उसळला होता.
- या अधिवेशनात स्वदेशी मालाचा पुरस्कार व विदेशी मालावर बहिष्कार टाकण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

## 22 वे अधिवेशन 1906

- **ठिकाण** - कलकत्ता
- **अध्यक्ष** - दादाभाई नौरोजी
- **स्वागताध्यक्ष** - डॉ. रासबिहारी घोष
- **सदस्य संख्या** - 1663
- 16 ठराव पास
- स्वराज्य शब्दाचा प्रथमच उल्लेख
- चतु:सुत्री स्वीकारली (स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, रा.शिक्षण)
- काँग्रेसच्या अध्यक्षाकडून **'स्वराज्य'** या शब्दाचा सर्वप्रथम उल्लेख केला गेला. त्याचबरोबर बंगालची फाळणी रद्द करण्याचा ठराव केला गेला.
- या अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी जहालाकडुन लोकमान्य टिळक यांचे नाव होते.
- दादाभाई नौरोजी हे काँग्रेसचे तिसऱ्यांदा अध्यक्ष झाले.
- 'चळवळ करा चळवळ करा अखंड चळवळ करा' असा संदेश दादाभाई नौरोजींनी दिला.

## 23 वे अधिवेशन 1907

- **ठिकाण** - सुरत
- **अध्यक्ष** - रासबिहारी घोष
- **स्वागताध्यक्ष** - त्रिभुवनदास माल्वी
- **सदस्य संख्या** - 1600
- काँग्रेसचे हे अधिवेशन **नागपूरला** होणार होते व स्वागत समितीच्या इच्छेनुसार लाला लजपतराय हे अध्यक्ष होणार होते.
- काँग्रेसच्या या अधिवेशनात स्वराज, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीवर कोणताच प्रस्ताव नव्हता.
- सूरत अधिवेशनात झालेल्या मतभेदामुळे काँग्रेसमध्ये जहाल व मवाळ गट निर्माण झाले व काँग्रेसमध्ये फूट पडली.
- या अधिवेशनाच्या कार्यक्रमपत्रिकेतुन मवाळांनी चतुसुत्रीपैकी स्वदेशी व बहिष्कार हे दोन शब्द वगळले.

## 24 वे अधिवेशन 1908

- **ठिकाण** - मद्रास
- **अध्यक्ष** - डॉ. रासबिहारी घोष
- **स्वागताध्यक्ष** - व्ही कृष्णस्वामी अय्यर
- **सदस्य संख्या** - 626
- रासबिहारी घोष हे सलग दुसऱ्यांदा अध्यक्ष होते.
- काँग्रेसच्या मवाळ गटाने काँग्रेससाठी एक नवीन संविधान तयार केले.
- भारतमंत्री लॉर्ड मोर्ले यांनी पाठिवलेल्या खलित्याचे अभिनंदन करण्यात आले.
- 20 ठराव पास
- जहाल गटाला काँग्रेसमधून निलंबीत केले.

## 25 वे अधिवेशन 1909

- **ठिकाण** - लाहोर
- **अध्यक्ष** - पं. मदन मोहन मालवीय
- **सदस्य संख्या** - 250
- **नियोजित अध्यक्ष -** फिरोजशहा मेहता
- रौप्यमहोत्सवी अधिवेशन.
- धर्मावर आधारित मतदारसंघाला विरोध.
- महात्मा गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील कार्याबद्दल अभिनंदनपर ठराव.
- 24 ठराव पास.

## 26 वे अधिवेशन 1910

- **ठिकाण** - अलाहाबाद
- **अध्यक्ष** - विलियम वेडरबर्न
- राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे दोनदा अध्यक्षपद भुषविणारी एकमेव ब्रिटीश व्यक्ती.
- याच अधिवेशानात कॉग्रेसच्या नेत्यांनी भारतात ग्रामपंचायतीची स्थापना करण्याची मागणी अध्यक्षांकडे केली.
- 30 ठराव पास.
- लॉर्ड मिंटो निवृत्त झाल्याने लॉर्ड हार्डिंग्ज यांचे स्वागतपर अभिनंदन.

## 27 वे अधिवेशन 1911

- **ठिकाण** - कलकत्ता
- **अध्यक्ष** - पंडित बिशन नारायण धार (नियोजित अध्यक्ष - सर रॅमसे मॅक्डोनाल्ड)
- **स्वागताध्यक्ष** - भुपेंद्रनाथ बसू

- याच अधिवेशनात रविंद्रनाथ टागोरांनी प्रथमच जन-मन-गण हे गीत गायिले.
- 32 ठराव पास.
- प्राथमिक शिक्षणाचा कायदा सरकारने करावा असा ठराव.

## 28 वे अधिवेशन 1912

- **ठिकाण** - बंकीपूर (पटना)
- **अध्यक्ष** - आर.एम. मुधोळकर
- **स्वागताध्यक्ष** - मझरुल उल हक्
- या अधिवेशनात ह्युमच्या निधनाची श्रद्‌ांजली वाहिली.
- अधिवेशनाच्या मंडपाच्या कमानीवर राजा पंचम जॉर्ज, व्हाईसरॉय हार्डिंग्ज व भारतमंत्री लॉर्ड क्रो यांचे नाव लिहिले होते.

## 29 वे अधिवेशन 1913

- **ठिकाण** - कराची
- **अध्यक्ष** - नवाब सय्यद महम्मद बहाद्दूर
- **सदस्य संख्या** - 550
- 22 ठरास पास.
- बॅरीस्टर जीना अधिवेशनाला उपस्थित.
- कॅनडा शासनाचा निषेध.
- गांधीजींचा उल्लेख करताना त्याच्या नावामागे महात्मा या पदवीचा उच्चार करावा हा ठराव पास.

## 30 वे अधिवेशन 1914

- **ठिकाण** - मद्रास
- **अध्यक्ष** - भुपेंद्रनाथ बसू
- **स्वागताध्यक्ष** - सर एस. सुब्रमण्यम् अय्यर
- **सदस्य संख्या** - 886
- ॲनी बेझंट प्रथमच अधिवेशनाला उपस्थित.
- मद्रास प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड पेंटलॅड ने अधिवेशनाला भेट दिली.

## 31 वे अधिवेशन 1915

- **ठिकाण** - मुंबई
- **अध्यक्ष** - सर सत्येंद्रप्रसन्न सिन्हा.
- **सदस्य संख्या** - 2259.
- 27 ठराव पास.
- सरोजिनी नायडू प्रथमच उपस्थित.
- कॉंग्रेस व मुस्लीम लीग यांच्यात सहकार्याची भावना.
- जहालांना कॉंग्रेसमध्ये घेण्यास संमती.

## 32 वे अधिवेशन 1916

- **ठिकाण** - लखनौ
- **अध्यक्ष** - अंबिका चरण मुजुमदार
- **स्वागताध्यक्ष** - पंडित जगत नारायण
- **सदस्य संख्या** - 2301
- राष्ट्रीय कॉंग्रेस व मुस्लिम लीगने स्वराज हे आपले ध्येय आहे घोषित केले.
- **हिंदू-मुस्लिम** ऐक्यामुळे या अधिवेशनास **ऐतिहासिक अधिवेशन** म्हणतात.
- आयएनसी + एमएल लखनौ करार.
  1) वसाहतीच्या स्वराज्याची मागणी.
  2) मुस्लीमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची निर्मिती.
- जहाल + मवाळ लखनौ ऐक्य (ॲनी बेझंटचे सहकार्य)
- टिळक + जिना यांचा पुढाकार.
- अधिवेशनात बिहारमधील चंपारण्य परिसरातील नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या अन्यायासंबंधी राजीव शुक्ला नावाच्या शेतकऱ्याने गांधीना खबर दिली होती.
- आता आपले दैव (Luck-Now) अशी शाब्दिक कोटी टिळकांनी केली.

## 33 वे अधिवेशन 1917

- **ठिकाण** - कलकत्ता
- **अध्यक्ष** - ॲनी बेझंट
- **स्वागताध्यक्ष** - पी.बी. वैकुंटनाथ सेन
- **सदस्य संख्या** - 4967
- डॉ. ॲनी बेझंट ह्या कॉंग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरल्या.
- या अधिवेशनात लखनौ अधिवेशनात पास झालेल्या कॉंग्रेस-लीग योजनेस तात्काळ लागू करण्याची मागणी केली गेली.
- या अधिवेशनाला पंडित नेहरु प्रथमच उपस्थित राहिले.
- या अधिवेशनात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यतेचा ठराव मांडला.

## 34 वे अधिवेशन 1918

- **ठिकाण** - दिल्ली
- **अध्यक्ष** - पं. मदन मोहन मालवीय
- **स्वागताध्यक्ष** - गंगाधरराव देशपांडे
- **सदस्य संख्या** - 4865

## मुंबई विशेष अधिवेशन 1918

- **ठिकाण** - मुंबई
- **अध्यक्ष** - सय्यद हसन इमाम
- **मॉटेग्यू चेम्सफर्ड रिपोट्र** वर विचार करण्यासाठी हे अधिवेशन बोलाविण्यात आले होते.

## 35 वे अधिवेशन 1919

- **ठिकाण** - अमृतसर
- **अध्यक्ष** - मोतीलाल नेहरु
- **सदस्य संख्या** - 7031
- **मॉटेग्यू चेम्सफर्ड रिपोट्र** विषयी मुख्य ठराव, बॅरिस्टर चित्तरंजन दास यांनी मांडला. खिलापत चळवळीला पाठींबा देणारा ठराव मांडला.

## कलकत्ता विशेष अधिवेशन 4 सप्टेंबर, 1920

- **ठिकाण** - कलकत्ता
- **अध्यक्ष** - लाललजपत राय
- असहकार चळवळीचा ठराव मांडला.
- हंटर कमिशनच्या विरोधात ठराव.
- जहाल गटातील प्रथम व्यक्ती अध्यक्षपदावर विराजमान.
- 1920 सालीच काँग्रेसचे विशेष अधिवेशन - AITUC "ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे" अधिवेशण भरले होते. विशेषत: हे अधिवेशन जालीयनवाला बाग हत्याकांड झाल्यामुळे भरविण्यात आले होते.

## 36 वे अधिवेशन 1920

- **ठिकाण** - नागपूर
- **अध्यक्ष** - चक्रवर्ती विजय राघवाचार्य
- **सदस्य संख्या** - 14000
- असहकार चळवळीचा ठराव पास केला.
- ब्रिटनमधील मजुर पक्षाचे पुढारी कर्नल बेजवुड उपस्थित.
- टिळक फंडाद्वारे 1 कोटी, 20 लाखातून 20 लाख चरखे घेतले.
- याच अधिवेशनात काँग्रेसने घटनेत बदल केले आणि भाषिक आधारावर प्रांतिक समित्या नेमल्या.
- याच कारणामुळे 1920 साली बॅ. जीना, डॉ. ॲनी बेझंट, बिपिनचंद्र पाल यांनी काँग्रेस सोडली.

## 37 वे अधिवेशन 1921

- **ठिकाण** - अहमदाबाद
- **अध्यक्ष** - चित्तरंजनदास (तुरुंगात असल्यामुळे हकिम अजमल खान प्रभारी अध्यक्ष म्हणुन निवड)
- 8 ठराव पास.
- या अधिवेशनात खुर्च्या व बाक ऐवजी भारतीय बैठकीचा वापर करण्यात आला होता.
- हसरत मोहानी यांना पूर्ण स्वराज्याची मागणी केली.

## 38 वे अधिवेशन 1922

- **ठिकाण** - गया
- **अध्यक्ष** - डॉ. चित्तरंजन दास (देशबंधू)
- भारताच्या पूर्ननिर्मितीसाठी पंचायतराज आवश्यकतेचे मत मांडले.
- कायदेमंडळातील प्रवेशावरुन वाद.
- फेरवादी व नाफेरवादी गट.
- स्वराज्य पक्ष स्थापन करण्याचा ठराव.

## 39 वे अधिवेशन 1923

- **ठिकाण** - काकिनाडा
- **अध्यक्ष** - मौलाना मुहम्मद अली
- कायदेभंगासाठी पाठींब्याचा ठरावा.
- अकाली शिखांच्या सत्याग्रहाला पाठींबा.
- स्वयंसेवी दलाची संघटना करावी असा ठराव.
- वंदे मातरम् या गीतातील दोन कडवे वगळण्यात आले.

## दिल्ली विशेष अधिवेशन 1923

- **ठिकाण** - दिल्ली
- **अध्यक्ष** - मौलाना अबुल कलाम आझाद
- यामध्ये कौन्सिल प्रवेशाला मान्यता.
- हिंदु-मुस्लीस सामजंस्यासाठी ठिकठिकाणी शांतता रक्षक समित्या नेमल्या.
- राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भुषविणारी वयाने सर्वांत लहान व्यक्ती (वय 34 वर्षे).
- याच अधिवेशनात स्वराज्यपक्षास निवडणूका लढविण्यास काँग्रेसने मान्यता दिली.

## 40 वे अधिवेशन 1924

- **ठिकाण** - बेळगाव
- **अध्यक्ष** - महात्मा गांधी
- **स्वागताध्यक्ष** - कर्नाटक सिंह
- गांधी-दास-नेहरु यांच्यात सामंजस्य करार.

## 41 वे अधिवेशन 1925

- **ठिकाण** - कानपूर
- **अध्यक्ष** - सरोजिनी नायडू (भारताची कोकिळा)

- **स्वागताध्यक्ष** - डॉ. मुरलीलाल
- सरोजिनी नायडू ह्या काँग्रेसच्या **सर्वप्रथम भारतीय महिला अध्यक्ष** झाल्या.
- अधिवेशनात विद्यार्थी गणेश शंकर यांनी "झेंडा ऊँचा रहे हमारा" हे गीत गायिले.

## 42 वे अधिवेशन 1926

- **ठिकाण** - गुवाहाटी
- **अध्यक्ष** - एस. श्रीनिवास अय्यंगार
- **स्वागताध्यक्ष** - टी.आर. फुकून
- सदस्यांसाठी खादी वापरणे बंधनकारक.
- विधायक कार्यक्रमाचा ठराव मोतीलाल नेहरुंनी तर हिंदु-मुस्लीम ऐक्याचा ठराव अय्यंगारांनी मांडला.
- लॉर्ड आयर्विन चा स्वागत ठराव.

## 43 वे अधिवेशन 1927

- **ठिकाण** - मद्रास
- **अध्यक्ष** - एम.ए. अन्सारी (मुक्तार महम्मद अन्सारी)
- हिंदुस्थानचे ध्येय स्वातंत्र्यच आहे फक्त स्वराज्य नाही, असा ठराव.
- सायमन कमिशनवर बहिष्काराचा ठराव.

## 44 वे अधिवेशन 1928

- **ठिकाण** - कलकत्ता
- **अध्यक्ष** - पं. मोतीलाल नेहरु
- **स्वागताध्यक्ष** - जे.एम. सेनगुहा
- नेहरु रिपोर्ट वर प्रस्ताव ठेवण्यात आला.
- पं. मोतीलाल नेहरू हे दुसऱ्यांदा काँग्रेसचे अध्यक्ष झाले.

## 45 वे अधिवेशन 1929

- **ठिकाण** - लाहोर
- **अध्यक्ष** - पं. जहवारलाल नेहरु
- **स्वागताध्यक्ष** - डॉ. सैफुद्दीन किचलू
- सलग अधिवेशनास पिता-पुत्र अध्यक्ष असण्याचा योग दिसला.
- पूर्ण स्वराज्याची मागणी.
- 26 जानेवारी 1930 हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणुन साजरा केला जावा.
- राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन डिसेंबर ऐवजी मार्चमध्ये भरावे असा ठराव.

## 46 वे अधिवेशन 1931

- **ठिकाण** - कराची
- **अध्यक्ष** - सरदार वल्लभभाई पटेल
- **स्वागताध्यक्ष** - डॉ. चोईतराम गिडवाणी
- भगतसिंह, सुखदेव यांच्या फाशीच्या शिक्षेबद्दल निंदा ठराव पास करण्यात आला.
- दुसऱ्या गोलमेज परिषदेला काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून गांधीजींच्या नावावर सर्वसंमती.
- मतदानाचा अधिकार 18 वर्षावरील सर्वांना मिळावा.
- कामगारांच्या वेतनाची हमी मिळावी.
- गांधी-आयर्विन कराराला मान्यता.
- मुलभूत हक्काचा ठराव.
- राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रम जाहीर.
- वंदे मातरम् चे दोन कडवे राष्ट्रगीत म्हणुन मंजुरी.

## 47 वे अधिवेशन 1932

- **ठिकाण** - दिल्ली
- **अध्यक्ष** - अमृत राणछोडदास शेठ (मदन मोहन मालवीय कारागृहात असल्यामुळे शेठ यांची कार्यकारी अध्यक्ष नियुक्ती)
- काँग्रेसला बेकायदेशीर ठरविण्यात आले.

## 48 वे अधिवेशन 1933

- **ठिकाण** - कलकत्ता
- **अध्यक्ष** - श्रीमती नलिनी सेनगुप्ता (राष्ट्रीय काँग्रेसच्या तिसऱ्या महिला अध्यक्षा) (मदन मोहन मालवीय कारागृहात असल्यामुळे सेनगुप्ता यांची कार्यकारी अध्यक्ष नियुक्ती)

## 49 वे अधिवेशन 1934

- **ठिकाण** - मुंबई
- **अध्यक्ष** - डॉ. राजेंद्रप्रसाद
- **स्वागताध्यक्ष** - के.पी. जरमन
- संविधान सभेद्वारे भारतातील संविधान तयार करण्याची मागणी करण्यात आली.
- काँग्रेस सोशालिस्ट पार्टीची स्थापना - जे.पी.

## 50 वे अधिवेशन एप्रिल 1935

- **ठिकाण** - लखनौ
- **अध्यक्ष** - पं. जवाहरलाल नेहरु
- हिंदुस्थानची खरी राज्यघटना हिंदी जनताच बनवू शकेल आणि लवकरात लवकर घटना समिती निर्माण केली जाईल.
- प्रथमच समाजवादाचा पुरस्कार.

## 51 वे अधिवेशन 1936

- **ठिकाण** - फैजपूर
- **अध्यक्ष** - पंडित जवाहरलाल नेहरु
- **स्वागताध्यक्ष** - शंकरराव देव
- पं. जवाहरलाल नेहरु हे **तिसऱ्यांदा** काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष झाले.
- **ग्रामीण भागातील हे पहिलेच** अधिवेशने होते.
- राष्ट्रीय काँग्रेसचे हे सुवर्ण महोत्सवी अधिवेशन (50वर्षे पुर्ण).
- या अधिवेशनाला शेतकऱ्यांची 40 हजार उपस्थिती होती.
- अधिवेशनाला लागूनच ग्रामोद्योग प्रदर्शन भरविले.
- शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे, सवलतीच्या दरात कर्ज वाटप करणे इत्यादींवर चर्चा करण्यात आली.
- घटनात्मक विधानसभेची मागणी.

  धनाजी नाना चौधरी व साने गुरुजी यांनी या अधिवेशनाचे आयोजन केले होते.

## 52 वे अधिवेशन 1938

- **ठिकाण** - हरिपूर (बार्डोली, गुजरात)
- **अध्यक्ष** - नेताजी सुभाषचंद्र बोस
- **स्वागताध्यक्ष** - दरबार गोपालदास देसाई
- संविधान समितीची स्थापना झाली.
- पूर्ण स्वराज्याची मागणी.
- राष्ट्रीय योजना समितीची स्थापना.
- 27 उपसमित्या नेमण्यात आल्या.

## 53 वे अधिवेशन 1939

- **ठिकाण** - त्रिपुरी (जबलपूर, मध्यप्रदेश)
- **अध्यक्ष** - नेताजी सुभाषचंद्र बोस
- **स्वागताध्यक्ष** - सेठ गोविंद दास
- इ.स. 1939 च्या त्रिपुरी (जबलपूर) अधिवेशनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी गांधीचे समर्थक **पट्टाभी सितारामय्या** यांचा पराभव केला होता.
- म. गांधीजी यांच्याबरोबर मतभेद निर्माण झाल्याने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. 9 मे, 1939 रोजी त्यांनी **फॉरवर्ड ब्लॉक** या पक्षाची स्थापना केली.
- नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राजीनामा दिल्याने **डॉ. राजेंद्रप्रसाद** यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.
- या अधिवेशनाच्या नंतर जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांचे बंधु शरदचंद्र बोस यांनी काँग्रेसच्या कार्यकारीनीचे पद त्यागले.

## 54 वे अधिवेशन 1940

- **ठिकाण** - रामगढ
- **अध्यक्ष** - मौलाना अबुल कलाम आझाद
- वैयक्तिक सत्याग्रह उठाव.
- 1941 ते 1945 अधिवेशने झाली नाहीत.
- स्वातंत्र्य पूर्व काळातील सर्वात जास्त काळ काँग्रेस अधिवेशने झाले नाही.

## 55 वे अधिवेशन 1946

- **ठिकाण** - मीरत
- **अध्यक्ष** - जे.बी. कृपलानी
- भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद जे.बी. कृपलानीकडेच होते.
- नेहरुंनी या अधिवेशनात स्वातंत्र्य, सार्वभौम, लोकसत्ता हा ठराव मांडला तसेच त्रिमंत्री योजनेतील हंगामी सरकार व घटना समिती या तरतुदीला मंजुरी दिली.

## 56 वे अधिवेशन 1948

- **ठिकाण** - जयपूर
- **अध्यक्ष** - पट्टाभिसीतारामय्या
- स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिले अधिवेशन.
- महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व म्हणजे 1947 पर्यंत 12 वेळा अधिवेशने झ ाली.

## अवांतर माहितीसाठी

# जहाल युग

(1905 - 1920)

**जहालयुग उदयाची कारणे -**

- काँग्रेसचे उदारमतवादी धोरण
- ध्येयधोरणबाबत अनिश्चितता.
- अयशस्वी कार्यपद्धती.
- ब्रिटीशांची दडपशाही.
- कर्झनची दडपशाही.
- बंगालची फाळणी.
- दिल्ली दरबार
- नैसर्गिक आपत्तीकडे दुर्लक्ष
- मवाळांच्या मागण्याकडे इंग्रजांचे दुर्लक्ष.

---

**जहालवादी नेते -**

- **लाल** = लाला लजपतराय
- **बाल** = बाळ गंगाधर टिळक
- **पाल** = बिपीनचंद्र पाल
- **अरविंद घोष**

## अवांतर माहितीसाठी

# बाळ गंगाधर टिळक




- **जन्म :-** 23 जुलै, 1856 रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील **'चिखलगाव'** या गावी झाला.
- **ओळख :-**
- लोकमान्य.
- मंडईचे कुलगूरू.
- भारताचा अनभिषिक्त राजा
- तेल्या तांबोळ्याचे पुढारी (18 पगड जाती)
- आधुनिक भारताचे शिल्पकार (म. गांधींनी पदवी दिली.)
- हिंदी राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते.
- हिंदी ही राष्ट्रभाषा असावी अशी मागणी करणारे पहिले भारतीय.
- राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली अटक झालेले टिळक हे पहिले राजकीय व्यक्ती.
- देशसेवेसाठी अनेकवेळा कारावास पत्करणारे टिळक प्रथम काँग्रेस नेता होते.
- भारतीय असंतोषाचे जनक (व्हॅलेंनटाईन चिरोल)

**कौटुंबिक पार्श्वभूमी व शिक्षण :-**

- टिळकांचे पूर्ण नाव **'बाळ गंगाधर टिळक'** असे होते (मूळ नाव 'केशव' होते).
- 1871 मध्ये वयाच्या 16 व्या वर्षी त्यांचा विवाह 'तापीबाई' यांशी झाला.
- त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षी 'आई' तर सोळाव्या वर्षी वडिलांचे निधन झाले.
- आई वडिलांच्या निधनानंतर त्यांचा सांभाळ त्यांच्या काकांनी केला (गोविंदपंत)
- 1873 साली टिळक मॅट्रीक पास झाले.
- बाळ/केशव हे गंगाधररावांच्या 3 मुली नंतरचे चौथे अपत्य होय.
- 1877 साली टिळक **'गणित'** विषयात बी.ए. पास झाले.

- 1879 साली टिळक **'एल.एल.बी.'** उत्तीर्ण झाले.
- वासुदेव बळवंत फडकेंनी स्थापलेल्या व्यायाम शाळेत त्यांनी शरीर सौष्ठव प्राप्त केले.

### शैक्षणिक कार्य :-

- लो. टिळकांनी देशाच्या उद्धारासाठी प्रथम शैक्षणिक कार्यास सुरुवात केली.
- 1 जानेवारी, 1880 रोजी 'पुणे' येथे **'न्यू इंग्लिश स्कूल'** ची स्थापना. लो. टिळक, गो.ग. आगरकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी केली.
- 1884 साली पुण्यात आगरकर, रानडे, भांडारकर यांच्या साथीने लो. टिळकांनी **'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'** ची स्थापना केली. (सर वेडनबर्न, एम.एस. कुंटे, के. गाडगीळ यांचापण सहभाग.)
- 2 जानेवारी, 1885 साली 'आगरकर मदतीने लो. टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीद्वारे **'फर्ग्युसन कॉलेज'** स्थापले.
- तेंव्हाचे मुंबई प्रांत गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांनी संस्थेस 1250 ची देणगी दिली व ते प्रथम देणगीदार होते. त्यामुळे त्यांचे नाव कॉलेजला दिले. (त्यामागे आणखी एक व्यवहारिक उद्देश म्हणजे गव्हर्नरचे नाव दिल्याने अनेक संस्थानिक देणगी देण्यास स्वत:हुन पुढे आहे.)
- लो. टिळक फर्ग्यूसन कॉलेजात **'गणित व संस्कृत'** विषयाचे अध्यापन करीत असत.
- फर्ग्युसन कॉलेजचे पहिले प्राचार्य 'वामन शि. आपटे'
- 'ज्योतिर्गणित' हा टिळकांचा आवडता विषय होता.
- पुढे टिळक व आगरकर यांच्यात मतभेद झाले व त्यामुळे लो. टिळकांनी 1890 साली डेक्कन एज्यु. सोसायटी व फर्ग्युसन कॉलेजच्या प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला.

### टिळकांचा तुरूंगवास :-

- कोल्हापूर संस्थानाचे दिवाण बर्वे (माधवराव)यांच्यावर वृत्तपत्रातून केलेल्या टिकेमुळे बर्वेंनी टिळक व आगरकरांविरोधात खटला दाखल केला. त्यात दोघांना 'साडेतीन महिने' (101 दिवस) शिक्षा झाली.
- चाफेकर बंधूंनी प्लेग कमिशनर 'रँड' व त्याचा सहकारी आयर्स्ट यांचा खून केला. (पुण्यात गणेशखिंडीत 22 जून 1897 रोजी)
- 15 जून, 1897 रोजी केसरीत 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे' व 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असे लेख लिहून रँड हत्येस उत्तेजन दिल्याचा आरोप (राजद्रोहाचा) ठेवून टिळकांवरती खटला भरला. (हा राजद्रोहाचा आरोपाखालील पहिला खटला होय.)
- रमेशचंद्र दत्त, दादाभाई नौरोजी, मॅक्समुल्लर यांनी त्यांच्या सुटकेचे प्रयत्न केले. यात टिळकांना 'दीड वर्षाची' शिक्षा झाली. (न्यायालयातील 9 पंचामध्ये 6 युरोपीय व 3 भारतीय होते.)
- 1908 मध्ये 'मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्ड' व जॅक्सनच्या खुनात टिळकांचा हात असल्याच्या संशयावरुन लो. टिळकांना 22 जुलै, 1908 ते 16 जून, 1914 पर्यंत 6 वर्षाची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली. (या शिक्षेसाठी 'हार्डिंग' बोटीने टिळकांची मुंबईतून रंगून येथील 'मंडाले' तुरुंगात रवानगी.)
- निकालानंतर 'पंचांचा निकाल काहीही असो पण मी निरपराध आहे, परमेश्वरी शक्तीच्या मनात कदाचित हेच असेल' असे टिळक म्हणाले.

### लोकमान्य टिळक व सार्वजनिक सभा :-

- पुण्याच्या सार्वजनिक सभेवरती न्या. रानडेंचा प्रभाव होता.
- 1895 साली लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक सभेची कार्यकारिणी बहुमत मिळवून हस्तगत केली व सार्वजनिक सभेवर ताबा मिळविला.
- 1896 मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला असता टिळकांच्या नेतृत्वात सार्वजनिक सभेने मदत कार्य हाती घेतले.
- त्यावर न्या. रानडे यांनी 1896 साली पुण्यात 'डेक्कन सभा' स्थापन केली.
- टिळक म्हणतात, "पण असल्या दांडगाईला जुमानता कामा नये, हे दिवस दांडगाईचे नाहीत, कायद्याचे आहेत हे रयत व सरकारी अंमलदारी या दोघांनी लक्षात ठेवले पाहिजे."

### शिवजयंती व गणेशोत्सव :-

- राष्ट्रकार्यात नि:स्वार्थपणे वाहून घेणाऱ्या तरुणांची पिढी तयार करण्यासाठी तसेच भारतीयांत राष्ट्रवाद निर्माण करुन एकी निर्माण करण्यासाठी टिळकांनी 1895 साली **'शिवजयंती'** व 1893 साली **'गणतपी उत्सवाची'** सुरुवात केली. (टिळकांच्या आगोदर 1869 साली **म. फुले यांनी सर्वप्रथम 'शिवाजी महाराजांची जयंती'** साजरी केली तसेच रायगडावरील त्यांची समाधी शोधून साफसफाई केली.)
- 1894 मध्ये पुण्यात गणेशोत्सव संपता संपता दंगल झाली.
- 1896 पासून मुंबई इलाख्यात 'गणेशात्सव' प्रभावी.
- टिळकांनी सार्वजनिक उत्सव सुरु केल्याबद्दल रानडे, आगरकर, चाफेकर, गोखले यांनी त्यावरती टिका केली.

### बंगालच्या फाळणीविरुद्ध लढा :-

- 1905 मध्ये कर्झनने 'फोडा व झोडा' या नितीचा वापर करुन लोकांच्या भावनांची कदर न करता बंगालची फाळणी केली. त्याविरोधात टिळकांनी या वंगभंग आंदोलनाला पाठींबा दिला.

### टिळकांची चतु:सूत्री :-

- लो. टिळक यांनी 'स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण' या चार सुत्रांचा वापर राष्ट्रीय चळवळीसाठी केला.
- स्वराज्याचा 'प्रजासत्ताक राज्य' हा अर्थ त्यांनी लोकांच्या मनावरती बिंबवला.
- **1916 'बेळगाव'** मुक्कामी असताना त्यांनी **'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच'** अशी घोषणा केली. (स्वराज्याचा अधिकार नैसर्गिक असून स्वराज्याचे ध्येय हिंदुस्थानचे आहे, अशी पहिली घोषणा इ.स. 1906 साली 'दाजी आबाजी खरे' यांनी रागयडाच्या शिवाजी महोत्सवात केली.)
- टिळक म्हणत, 'ज्याप्रमाणे जपान स्वतंत्र उपभोगत आहे त्याप्रमाणे आम्हीसुद्धा देशाचे शासन करु शकतो.' सर्व ब्रिटिश मालावरती बहिष्कार टाकण्याचे आवाहन टिळकांनी जनतेला केले.
- इ.स. 1905 पासून बहिष्कारास सुरुवात झाली.
- 1905 मध्ये दसऱ्याच्या दिवशी पुण्यात टिळक व शिवरामपंत साक्षीने भारतातील पहिली परेदशी कापडाची होळी केली.
- 'संजीवनी' या वृत्तपत्रातून कृष्णकुमार मित्र यांनी (बंगाल) सर्वप्रथम बहिष्काराच्या आंदोलनाचा पुरस्कार केला.
- 1896 ला न्यू इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा परदेशी कापडाची होळी केली होती.
- देशाच्या कल्याणासाठी देशी कपड्याचा वापर करण्याचा आग्रह टिळकांनी धरला.
- स्वदेशी चळवळीचा हेतू देशी व्यापार उद्योगधंद्यांचा विकास करणे हे होते.
- स्वत: टिळकांनी त्यांच्या वर्तमानपत्रासाठी भारतीय कागद वापरण्यास सुरुवात केली.
- देशी उद्योगांना चालना देण्यासाठी टिळकांनी 1903 मध्ये 'पैस फंड' उभारला व या फंडातून उद्योगांना आर्थिक मदत केली.
- 1906 मध्ये मुंबई स्थापन झालेल्या 'स्वदेशी सहकारी भांडारा'स टिळकांनी मदत केली.
- त्या काळी शाळा कॉलेज विद्यापीठे हे सर्व ब्रिटीश नियंत्रणात असल्याने तेथे विद्यार्थ्यांना देशाचा इतिहास संस्कृती धर्म राजकीय स्थिती यांचे शिक्षण देत नव्हते.
- टिळक - 'National Education must be on National times and under National Control' असे म्हणत.
- 'हे आमचे गुरु नव्हेत' असे 3 लेख त्यांनी 1905 ला केसरीतून लिहून प्रोफेसरांवरती टिका केली.
- 'राष्ट्रीय शिक्षण व खाजगी शाळांची जबाबदारी' या शिर्षकाचे 3 लेख नोव्हेंबर 1906 ला केसरीत लिहीले.
- इ.स. 1906 मध्ये टिळकांनी 'महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाला' 20,000 रु. देणगी दिली.
- लोकमान्यांनी धार्मिक शिक्षणावरती देखील भर दिला.
- शिक्षण 'मातृभाषेतून' देण्यात यावे या मताचे टिळक होते.
- 1906 साली नौरोजींच्या अध्यक्षतेत 'कोलकता' येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनात हा चतु:सूत्रीचा ठराव पास करण्यात आला.
- या 1906 च्या अधिवेशनाचे अध्यक्षपदी टिळकांना करावे असे बिपीनचंद्र पाल यांनी प्रस्ताव मांडला होता. तर मवाळांनी दादाभाई नौरोजींचे नाव पुढे केले.

### सुरत अधिवेशन 1907 व टिळक :-

- 1889 च्या कॉंग्रेस अधिवेशनापासून टिळकांचा कॉंग्रेस अधिवेशनात सहभाग.
- कॉंग्रेस अधिवेशन ठरल्याप्रमाणे 1907 मध्ये नागपुरात होणार होते पण तेथे जहालवाद्यांचा प्रभाव असल्याने ते अधिवेशन मवाळवाद्यांचा प्रभाव असलेल्या 'सुरत' येथे घेण्याचे ठरले.
- जहालवाद्यांनी अध्यक्षपदासाठी 'लाला लजपतराय' यांचे नाव पुढे केले तर मवाळांनी 'रासबिहारी बोस' यांचे नाव पुढे केले.
- अध्यक्षपदी 'रासबिहारी बोस' यांची निवड झाल्यानंतर मवाळांनी जहालवाद्यांच्या कलकत्ता अधिवेशनातील चतु:सुत्री ठरावाला बगल दिली.
- स्वागत समितीच्या अध्यक्षपदी 'पं. मदन मोहन मालवीय' होते.
- टिळकांनी नंतर अरविंद घोष यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले होते.
- 'सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी' जहाल व मवाळांतील मध्यस्ती करण्याचा प्रयत्न केला. पण तो अपयशी ठरुन वाद वाढला व कॉंग्रेसमध्ये फूट पडली.

### कॉंग्रेसमध्ये टिळकांचा पूर्नप्रवेश :-

- 1907 च्या अधिवेशनानंतर जहालवाद्यांना कॉंग्रेस पासून दूर करण्यात आले होते.
- त्यातच 24 जुन, 1908 रोजी टिळकांना केसरीतील लेखाबद्दल जनद्रोहाचा आरोप ठेवून अटक केली. (खटला न्या. दावर यांच्यासमेर चालला.)

- खटल्यात टिळकांना 6 वर्षांचा तुरुंगवासाची शिक्षा झाली.
- 17 मे, 1914 रोजी टिळकांची सुटका झाली.
- टिळकांच्या काँग्रेस प्रवेशाला विरोध असलेले 'गोखले व मेहता' मरण पावले होते.
- ॲनीबेझंट यांनी प्रयत्न करुन 1915 साली टिळकांचा काँग्रेसमध्ये प्रवेश करविला.
- पुढे टिळकांच्या मदतीने **1916** साली **'काँग्रेस व मुस्लीम लीग'** यांच्यात **'लखनौ करार'** झाला.
  (अध्यक्ष - आर.सी. मजुमदार)

### होमरूल लीग चळवळ व टिळक :-

- 28 एप्रिल, 1916 रोजी लोकमान्य टिळकांनी 'बेळगाव' मध्ये 'होमरूल लीग चळवळीची' स्थापना केली.
- अध्यक्ष - जोसेफ बॅप्टिस्ट, सचिव न.चि. केळकर, (दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, शि.ल. करंदीकर यांचा पण त्यात सहभाग होता.)
- 1 सप्टेंबर, 1916 रोजी 'ॲनी बेझंट' या आयरिश महिलेने 'मद्रास' येथे होमरुल चळवळ सुरु केली.
- जोसेफ बॉप्टिस्टच्या नेतृत्वात एक मंडळ लंडनला पाठविले.
- न्युयॉर्कमध्येही 'इंडियन होमरुल लीग' स्थापन झाली होती.
- भारतमंत्री मॉटेग्यु - "The Biggest Leader of India at this Time"

### टिळकांची पत्रकारिता :-

- लो. टिळकांनी 1881 साली आगरकर, चिपळूणकर व इतरांच्या मदतीने 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांची सुरुवात केली.
- केसरी (मराठी) - 2 जानेवारी, 1881
  मराठा (इंग्रजी) - 4 जानेवारी, 1881.
- सुरुवातीला केसरी आगरकरांकडे तर मराठा वृत्तपत्राचे 'लोकमान्य टिळक' संपदक होते.
- भोवताली घडणाऱ्या घटनांची माहिती समाजाला देणे हा केसरीचा प्रमुख उद्देश होता तर मराठा वृत्तपत्र हे मुख्यत: शिक्षीत भारतीयांसाठी होते.
- 1882 साली केसरी सर्वाधिक खपाचे वृत्तपत्र बनले.
- पुढे आगरकर व टिळक यांत मतभेद झाले व आगरकरांनी केसरी चे संपादकत्व सोडले त्यावेळी टिळक केसरीचे संपादक झाले.
- 1881 ते 1920 काळात टिळकांनी 513 अग्रलेख लिहीले.
- 1897 ला केसरीत 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे', 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' हे अग्रलेख छापून आले.

### प्रतियोगी सहकारिता संकल्पना : (रिस्पॉन्सिव्ह को-ऑपरेशन)

- 1917 मध्ये भारतमंत्री मॉंटेक्यू यांनी घोषणा केल्यानंतर त्याला प्रतिसाद म्हणून टिळकांनी 'प्रतियोगी सहकारितेची' संकल्पना मांडली.
- सहकाराचे उत्तर सहकाराने तर असहकाराचे उत्तर असहकाराने द्यावे या मताचे टिळक होते.

### वाङ्मय :-

- ओरायन (हा ग्रंथ लिहीताना त्यांनी 'शंकर बाळकृष्ण दिक्षीतांशी' विचार विनीमय केला).
- आर्क्टिक होम ऑफ वेदाज (वरील दोन्ही ग्रंथ 1893 ला टिळकांनी सिंहगडावरती लिहीले.)
- गीतारहस्य
- 'ओरायन' चे मराठी भाषांतर 'के. ल. ओगले' यांनी केले.
- The Hindus Philosophy of Life Ethics and Religion 1887

### लोकमान्य टिळक व लोकशाही पक्ष :-

- टिळकांनी 1920 मध्ये काँग्रेस अंतर्गत निवडणुका लढविण्यासाठी लोकशाही पक्षाची स्थापना केली.

### मृत्यू :-

- 1 ऑगस्ट, 1920 रोजी त्यांचा मृत्यू झाला.
- टिळकांनी सुरु केलेल्या शिवाजी उत्सवाचे लोन 1902 साली प्रथम बंगालमध्ये पोचले ते **'सखाराम गणेश देऊसकर'** यांच्यामुळे (त्यानंतर 1906 ला कलकत्ता येथे प्रभावीपणे शिवाजी उत्सवाचा सोहळा आयोजित झाला. त्यात टिळक, खापर्डे, मुंजे, बिपिनचंद्र पाल यांची भाषणे झाली.)

### मत / वर्णन :-

- **अरविंद घोष -** टिळक हे मराठी माणसाचे 100 प्रतिनिधी होते आणि टिळक धडाडीचे निस्वार्थी व जहालाचे स्फूर्तीस्थान होते.
- **चित्तरंजन दास** - टिळक स्वयंभू ताऱ्याप्रमाणे तेजस्वी होते.
- **राम गणेश गडकरी -** टिळक मंडालेला गेल्यापासुन या पुणे शहरात दुरून येणारा माणुस पाहुन चटकन हातातली विडी विझवावी या लायकीचे कोणी राहिलेले नाहीत.
- **धनंजय कीर -** जनता व राजकारण यांना एकत्र जोडणारा टिळक हा भारतातील नव्हे तर आशिया खंडतील एकमेव नेता होय.
- **माऊँट बॅटन -** टिळकाच्या समकालात टिळकाएवढा प्रभावी नेता नव्हता.

## स्वराज्य पक्षाच्या अपयशाची कारणे

- संसदीय राजकारणावर अधिक भर दिल्याने स्वराज्य पार्टीचे अंतर्गत राजकारण धोक्यात आले.
- कायदेमंडळातील काम आणि बाहेरील लोकामध्ये राजकीय कार्य यांच्यात समन्वय साधला नाही.
- युती केलेल्या गटाना सोबत घेऊन चालले नाहीत.
- सरकारची प्रत्येक ठिकाणी अडवणुक केली नाही.
- सरकारविरोधी काम करण्याची धार कमी झाली.
- ब्रिटिशांची फोडा आणि झोडा नीती
- पक्ष शिस्तीचा अभाव
- जनतेच्या पाठींब्याचा अभाव
- काही दिवसानंतर यात खालील दोन गट पडले.


1) लाला लजपतराय, मदनमोहन मालवीय, एन.सी. केळकर, एम. जयकर यांच्या मते सरकारशी सहकार्य करुन सरकारी कार्यावर नियंत्रण ठेवणे.

2) मोतीलाल नेहरु यांच्या मते, कायदेमंडळाच्या कामाला मर्यादा असल्यामुळे बाहेर पडून सविनय कायदेभंगाच्या कार्यात सहभागी व्हावे.

1919 च्या ॲक्टविरोधात चौकशी करण्यासाठी मुद्दीमन कमीशन (1924) नेमण्यास स्वराज्य पक्षाने भाग पाडले होते. या कमिशनमध्ये भारतीयांनीच राज्यघटना तयार करावी असेही सांगण्यात आले. हे कमिशन अलेक्झांडर मुद्दीमन (मुडीमन) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आले होते. काही कालावधीनंतर रॉयल कमिशनची नेमणूक करण्यात आली.

## अवांतर माहितीसाठी

## मुळशी सत्याग्रह (1921-24)





**नेतृत्त्व :-** सेनापती बापट

**पूर्ण नाव :-** पांडुरंग महादेव बापट

**पहिले सत्याग्रही :-** शंकरराव देव

- इंग्रजांनी मुळशी तालुक्यात मुळा नदीवर जलविद्युत निर्मितीसाठी एक धरण बांधण्यास सुरुवात केली होती त्याचे टेंडर टाटा कंपनीला देण्यात आले होते.
- धरणासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी वापरण्यात येत होत्या त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न शासनाने सोडविला नव्हता. म्हणुन हा सत्याग्रह करण्यात आला.
- या सत्याग्रहात शंकरराव देव, शिवरामपंत परांजपे, डॉ. फाटक, डॉ. भोपकर, तात्या केळकर इत्यादी लोकांनी बापटांना मदत केली.
- इंग्रजांनी पुनर्वसिताकडे दुर्लक्ष केल्यामुळे सेनापती बापटांनी इंजन चालकावर गोळ्या घातल्या म्हणून बापटांना 7 वर्षाच्या सक्त मजुरीची शिक्षा झाली.

## बार्डोली सत्याग्रह (1927)




**नेतृत्व :-** वल्लभभाई पटेल.

**ओळख :-** भारताचा बिस्मार्क, लोहपोलादी पुरुष

- इंग्रजांनी गुजरातमधील बार्डोली परिसरात ऐन दुष्काळात 25% ने शेतसारा वाढविला होता. म्हणून वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली हा सत्याग्रह करण्यात आला.

- पटेलांच्या नेतृत्वामुळे ब्रिटीशांनी वाढीव शेतसारा मागे घेतला.
- पटेलांनी हा सत्याग्रह यशस्वी केल्यामुळे महात्मा गांधींनी जनतेच्या वतीने त्यांना सरदार ही पदवी दिली.

## सायमन कमिशन (1927)

- 1919 च्या कायद्याची समिक्षा करण्यासाठी दर 10 वर्षांनी आयोग स्थापण्याची शिफारस.

**पण हा आयोग लवकरच आला. कारण :-**

1. पुढच्या निवडणुकीत Conservative party ला असे वाटत होते की Labour party जिंकेल.
2. भारतसचिवाची इच्छा नव्हती की याचे श्रेय (आयोग स्थापण्याचे) Labour Party कडे जावे.
3. क्रांतीकारी चळवळीला आळा घालणे.
4. 1919 सालचा माँटेग्यू चेम्सफोर्ड कायदा निष्प्रभ ठरला होता.
5. स्वराज्य पक्षाच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे गरजेचे होते.

म्हणून भारतमंत्री बर्कनहेड याने सायमन कमिशन दोन वर्षांनी आगोदर भारतात बोलावले. या कमिशनमध्ये एकुण 7 सदस्य होते व तेही संपूर्ण ब्रिटीशच होते.

**आयोगातील सदस्य :-**

1. सर जॉन सायमन - अध्यक्ष
2. क्लाईमेन्ट ॲटली
3. हेन्री लेवी लासन
4. एडवर्ड काडोगान
5. वेनॉर्न हार्टशोर्न
6. जॉर्ज लेन फॉक्स
7. डोनाल्ड हॉवर्ड

**भारत परिषदाद्वारा आयोगाच्या साह्यासाठी अखिल भारतीय समितीची नियुक्ती करण्यात आली, यात खालील सदस्यांचा समावेश होता :-**

1. सर सी शंकरन् नायर
2. सर ऑर्थर फ्रुम
3. राजा नवाब अली खान
4. सरदार शिवदेव सिंह उवेराय
5. नवाब सर जुल्फीकार अली खान
6. सरहरिसिंह गौर
7. सर अब्दुला अल-मनुन
8. कीकाभाई प्रेमचंद
9. रायबहाद्दूर एम.सी. राजा

सायमन कमिशनला भारतीयांनी विरोध केला. विशेषतः काँग्रेसने जास्त विरोध केला, कारण त्यांना सायमन कमिशनमध्ये स्थान दिले नव्हते.

- सायमन कमिशन सर्वप्रथम **3 फेब्रुवारी, 1928 मध्ये मुंबई शहरात दाखल** झाले. यावेळी सायमनला भारतीयांनी काळे झेंडे दाखवून सायमन गो बॅक असे नारे दिले.




- **भारतात सायमन कमिशनला काँग्रेस, किसान कामगार पार्टी, लिबरल फेडरेशन, हिंदु महासभा व मुस्लीम लीग यांनी विरोध केला.**
- मुस्लीम लीगमध्ये सायमन कमिशनमुळे फुट पडली व दोन गट निर्माण झाले.
  1. मोहम्मद शफीचा - सायमनला पाठींबा दिला.
  2. बॅरिस्टर जीना - सायमनवर बहिष्कार टाकला.
- **पजांब संघवादी, जस्टिस पार्टी, डिप्रेस्ड क्लासेस मिशन (डॉ. बी.आर. आंबेडकर) यांनी सायमनला समर्थन दिले.**
- सायमनला विरोध करणारी ठिकाणी :-

1. मुंबई - युसुफ मेहरअली
2. लखनौ - जवाहरलाल नेहरु, गोविंद वल्लभ पंत, खलिफ उज्मा
3. मदास - टी. प्रकाशम
4. कलकत्ता - सुभाषचंद्र बोस
5. लाहोर (पंजाब) - लाला लजपतराय

- सायमन कमिशन भारतात 6 महिने होते.

**सायमन कमिशनला विरोध करण्यात युवक सर्वात जास्त समोर होते.**

**जसे -**

**- जवाहरलाल नेहरु, - सुभाषचंद्र बोस,**

**- गोविंद पंत, - युसुफमेहरअली**

- 30 ऑक्टोबर, 1928 सायमन कमिशनला विरोध करत असताना सॅन्डर्सच्या लाठीहल्ल्यात लाला लजपतराय जखमी झाले व 17 नोव्हेंबर, 1928 मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचा बदला म्हणून भगतसिंह, सुखदेव, राजगुरु यांनी सॅन्डर्सचा खून केला.

**सायमन कमिशनचा अहवाल :-**

हा अहवाल 27 मे, 1930 रोजी जाहीर करण्यात आला होता त्यात वसाहतीच्या स्वातंत्र्याचाही उल्लेख नव्हता.

1. प्रांतातील द्विदल शासनपद्धती रद्द करावी/केंद्रातील द्विदल शासन पध्दतीचा स्विकार करु नये.
2. केंद्रीय कायदेमंडळाची पुनर्रचना व्हावी व प्रांतीय कायदेमंडळातून सदस्य अप्रत्यक्षरित्या निवडुन द्यावेत.
3. विधानसभेचा विस्तार व्हावा/प्रांतीक स्वायत्तता
4. केंद्रात उत्तरदायी सरकारचे गठन करु नये - ही बरोबर वेळ नाही.
5. गव्हर्नरकडे शांतता व सुरक्षा आणि अल्पसंख्याक संरक्षणाचे अधिकार हवेत.
6. मतदान अधिकारात वाढ हवी (2.8% वरुन 10-15%)
7. गव्हर्नरकडे संविधान कार्यात हस्तक्षेप करण्याचे अधिकार असावेत.
8. केंद्रात एक फेडरल असम्बेली असावे ज्यात जनसंख्येच्या आधारावर क्षेत्राचे प्रतिनिधी असावेत.
9. Council of State ला Upper House रुपातच ठेवून त्याचे सदस्य प्रांतीय परिषदेद्वारा निवडावेत.
10. अखिल भारतीय संघाचा विचार तात्काळ कार्यान्वित करु नये.
11. केंद्रीय कार्यपालिकेत काहीही बदल करु नये.
12. बर्माला ब्रिटीश भारतापासून वेगळे ठेवावे - त्याचे स्वतंत्र एक संविधान असावे.

## नेहरु अहवाल (ऑगस्ट, 1928)

- तत्कालीन भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनी भारतीय लोक भारताच्या घटनात्मक संरचनेचा प्रश्न सोडवू शकत नाही, अशी टिका केली.
- भारतीय नेत्यांनी हे अहवान स्वीकारुन कॉंग्रेसच्या मद्रास अधिवेशनात विविध राजकीय पक्षाची व सामाजिक पक्षाची सर्वपक्षीय परिषद भरविण्यात आली.

1. 12 फेब्रुवारी, 1928 - सर्वपक्षीय पहिली परिषद - अध्यक्ष, अहमद अन्सारी
2. मार्च, 1928 - सर्वपक्षीय दुसरी परिषद.
3. 28 मे, 1928 - सर्वपक्षीय तिसरी परिषद - मुंबई. अध्यक्ष, मोतीलाल नेहरु.

**या समितीत खालील व्यक्तींचा समावेश होता.**

1. मोतीलाल नेहरु : उपसमितीचे अध्यक्ष
2. तेज बहादूर सप्रू : लिबरल फेडरेशन
3. सर अली इमाम व शोएब कुरेशी : मुस्लिम प्रतिनिधी
4. एम.एस. अणे् व एम.आर. जयकर : हिंदू महासभा
5. मंगल सिंग : शिख लीग
6. एन. एम. जोशी : कामगार प्रतिनिधी
7. जी. आर. प्रधान : ब्राह्मणेत्तर
8. सुभाषचंद्र बोस : कॉंग्रेस
9. जवाहरलाल नेहरु : सेक्रेटरी

या कमिटीने अलाहाबाद येथून आपले काम सुरु 10 ऑगस्ट, 1928 ला अहवाल पूर्ण केला व या कमिटीची चौथी बैठक 28 ऑगस्ट, 1928 ला लखनौ येथे भरली व तेथे अहवाल मांडण्यात आला.

**नेहरु रिपोर्टच्या मुख्य शिफारसी :-**

1. भारताला वसाहतीचा दर्जा द्यावा. **(इंग्रजाच्या कॅनडा व ऑस्ट्रेलियातील वसाहतीसारखे)**
2. प्रांताचे विभाजन भाषिक आधारावर/**भौगोलिक परिस्थितीनुसार पुनर्रचना.**
3. प्रांतीय सरकार कार्यकाळ 5 वर्षे.
4. भारत धर्मनिरपेक्ष पण अल्पसंख्याकाच्या हितसंबंधाचे संरक्षण.
5. केंद्र व प्रांतात अधिकाराचे वाटप, शेषाधिकार केंद्राकडे.
6. संयुक्त निवडणुक पद्धती लागू करावी.
   मुस्लिम अल्पसंख्याक प्रदेशात त्यांना राखीव जागा पण Bengal व पंजाबमध्ये नाही.
7. भारतात एक संरक्षण समिती, उच्च न्यायालय व लोकसेवा आयोगाची स्थापना करावी.
8. केंद्रात उत्तरदायी सरकारच्या स्थापनेनंतरच राज्यांना संघात समाविष्ट करणे.
9. सिंध मुंबई प्रांतापासून वेगळा करावा.
10. मुलभूत हक्क / अधिकार मागणी.
11. महिलांना समान अधिकार / संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.
12. वयस्क मतदानाचा अधिकार.
13. हिंदुस्थान संघ - त्याची लिपी देवनागरी / उर्दु असेल.
14. प्रांताना त्यांच्या मुख्य भाषा.

- मुस्लीम लीगने म्हणजेच बॅ. जीनांनी नेहरु रिपोर्ट फेटाळला कारण यात मुस्लिमांच्या वेगळ्या मतदार संघाची मागणी नव्हती. म्हणून **इंग्रजांनी या रिपोर्टकडे दुर्लक्ष केले.**
- 22 डिसेंबर, 1928 रोजी नेहरु अहवालाची 5 वी परिषद कलकत्ता येथे भरली व यात वेगवेगळ्या पक्षाचा समावेश होता.
- बॅ. जीना कॉंग्रेसपासून दूर गेले व मार्च, 1929 मध्ये स्वतंत्र 14 मुद्दे जाहीर केले. याच मुद्यावर त्यांची पुढील राजकीय विचारसरणी अवलंबून होती.

**बॅ. जीनांचे 14 मुद्दे :-**

1. प्रांतिक स्वायत्तता.
2. संघराज्यीय घटना, शेषाधिकार प्रांतांकडे असावे.
3. सर्व कायदेमंडळांमध्ये व निर्वाचित बॉडीमध्ये मुस्लिमांसाठी पर्याप्त प्रतिनिधीत्व.
4. सेवा व स्वशासित यंत्रणांमध्ये मुस्लिमांना पर्याप्त प्रतिनिधीत्व.
5. संघराज्यातील प्रांतांच्या संमतीशिवाय केंद्राने घटनादुरुस्ती करु नये.
6. केंद्रीय कायदेमंडळात मुस्लिमांना 1/3 प्रतिनिधीत्व.
7. केंद्रीय तसेच प्रांतिक सरकारांमध्ये मुस्लिमांना 1/3 प्रतिनिधीत्व.
8. प्रौढ मतदान पद्धती लागू होईपर्यंत, मुस्लिमबहुल प्रांतांमध्ये स्वतंत्र मतदारसंघ.
9. कोणत्याही प्रादेशिक पुनर्रचनेमुळे पंजाब, बंगाल आणि वायव्य सरहद्द प्रांत या प्रांतांमधील मुस्लिम बहुसंख्येवर परिणाम होऊ नये.
10. कोणत्याही कायदेमंडळात जर एखादे विधेयक किंवा प्रस्ताव अल्पसंख्यांक समुदायाच्या 3/4 हून अधिक सदस्यांना आपल्या हितसंबंधांच्या विरोधी असल्याचे वाटत असेल तर ते विधेयक/प्रस्ताव पारित करण्यात येऊ नये.
11. सिंध प्रांत बॉम्बे प्रांतापासून वेगळा करण्यात यावा.
12. वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तान मध्ये घटनात्मक सुधारणा करण्यात याव्या.
13. मुस्लिमांचे धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व भाषिक हक्कांचे संरक्षण व्हावे.
14. सर्व समुदायांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य असावे.

## लाहोर अधिवेशन (1929)

- लाहोर अधिवेशन हे कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांपैकी सर्वात अविस्मरणीय अधिवेशन ठरले. गांधीजींच्या इच्छेनुसार जवाहरलाल नेहरुंना अधिवेशनाचे अध्यक्ष बनविण्यात आले. पुढील चळवळ तरुणांनी लढायची असल्याचे तिचे नेतृत्वही सक्षम तरुण नेत्याकडे असावे असे त्यांचे मत होते.

**अधिवेशनाचे वैशिष्ट्ये :-**

1. पुर्ण स्वराज्याचा ठराव पारीत करण्यात आला.
2. गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकण्यात आला.
3. कॉंगेस कार्यकारिणीचा सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम सुरु करण्याचा अधिकार देण्यात आला.
4. निवडणुका व समित्यावर बहिष्कार टाकण्यात आला.
5. **26 जानेवारी, 1930 हा दिवस पहिला 'स्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरविण्यात आले. (स्वातंत्र्यपूर्व काळातील हा स्वातंत्र्यदिन होता. परंतू भारताला 15 ऑगस्ट 1947 ला स्वातंत्र्य भेटले.)**

- अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी 31 डिसेंबरच्या, 1929 च्या मध्यरात्री जवाहरलाल नेहरुंनी रावी नदीच्या तीरावर स्वातंत्र्याचा तिरंगा झेंडा फडकाविला तर ठरल्याप्रमाणे 26 जानेवारी, 1930 या दिवशी देशामध्ये अनेक ठिकाणी तिरंगा ध्वज फडकाविण्यात आला.

## 14 फेब्रुवारी, 1930 - सविनय कायदेभंगाची चळवळ

**पार्श्वभूमी :-**

1. गांधींनी ब्रिटीशांना नेहरु रिपोर्ट लागू करण्यासाठी मुदत दिली.
2. मुदतीचा कालावधी संपल्यानंतरही इंग्रजांनी या रिपोर्टकडे दुर्लक्ष केले.
3. यावेळी गांधींनी इंग्रजांसोबत तडजोड करण्यासाठी 11 मुद्दे मांडले.

**उद्दिष्टये - कायदे मोडून प्रशासनाला जेरीस आणणे**

उदा.
1. सरकारने संपूर्ण दारुबंदी करावी.
2. पन्नास टक्के शेतसारा माफ करावा.
3. लष्करी खर्चात 50% कपात करावी.
4. मिठावरील कर रद्द करावा.
5. विदेशी मालावर आयात कर लावावा.
6. देशी मालाला संरक्षण द्यावे.
7. राजकीय कैद्यांची सुटका करावी.
8. गुप्तहेर पद्धती रद्द करावी.
9. स्वतःच्या संरक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीस शस्त्र बाळगण्याची परवानगी द्यावी.

10. भारताचा समुद्रकिनारा देशी जहाजांना वापर करण्यासाठी कायद्यामार्फत सुरक्षित करावा.

11. मुलकी सेवेतील उच्च पदावरील अधिकाऱ्याचे 50% वेतन कमी करावे.

- वरील सर्व मागण्या ब्रिटीशांनी अमान्य केल्यामुळे गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह केला.

**- मिठाच्या सत्याग्रहाचे अंतीम उद्दिष्ट पूर्ण स्वराज्य मिळणे असे होते.**

### दांडी यात्रा व मिठाचा सत्याग्रह

- गांधीनींनी तत्कालिन गव्हर्नर लॉर्ड आर्यविन यांना 2 मार्च, 1930 मध्ये दांडी यांत्रा सुरु करण्याबद्दल पत्र पाठविले होते.
- सुरुवात - 12 मार्च, 1930. (सकाळी 6.30 वाजता)
- शेवट - 5 एप्रिल, 1930. (परंतु 6 एप्रिलला सकाळी 8.30 वाजता मिठाचा कायदा मोडला.)
- यात्रेचा मार्ग - साबरमती ते दांडी.
- एकुण अंतर - 385 किमी (241 मैल)
- एकुण अनुयायी - 78.
- एकूण दिवस - 24
- महाराष्ट्रातील सहभागी - 13
- दांडी यात्रेत सहभागी महिला - 8

### दांडी यात्रेबद्दल मांडलेली वेगवेगळी मते :-

**1.** **सुभाषचंद्र बोस** यांच्या मते, दांडी यात्रेची तुलना नेपोलियनने एल्बाहून परतल्यावर पॅरिसकडे केलेल्या संचलनाशी केली होती.

**2.** **प. जवाहरलाल नेहरु** यांच्या मते, मीठ या शब्दाला अचानक एक आगळेवेगळे सामर्थ्य प्राप्त झाले. दैनंदिन गरजेच्या साध्या वस्तूंचा राष्ट्रीय स्वातंत्र्यसंग्रामाशी संबंध जोडणे आम्हाला सोपे वाटत नव्हते. ती किमया गांधीनी करुन दाखविली.

**3.** **सुभाषचंद्र बोस** यांच्या मते, आणीबाणीच्या वेळी गांधीजींचे उपजत नेतृत्व मुत्सद्देगिरीचा किती उच्चांक गाठु शकते याची कल्पना आपल्याला यावेळी आली.

- गांधीजींना प्रोत्साहन देण्यासाठी भारतात वेगवेगळ्या ठिकाणी सत्याग्रह करण्यात आले.
- ज्या राज्यांना समुद्र किनारा आहे तेथे मिठाचा सत्याग्रह तर जेथे समुद्र किनारा नाही तेथे जंगल सत्याग्रह करण्यात आला.
- तामिळनाडूच्या तंजौर समुद्र किनाऱ्यावर सी. राजगोपालचारी यांनी त्रिचिनापल्ली ते वेदारण्यम पर्यंत मिठयात्रा काढली.
- मलबार किनाऱ्यावर के. कलप्पन यांनी कालिकत ते पोयान्नूर पर्यंत मिठयात्रा काढली.
- आसाममधील लोकांनी सिलहट पासून प. बंगालमधील नौखाली प्रातांपर्यंत मिठयात्रा काढली.
- ओरिसातील बालसोर व पुरी येथे मिठ केंद्र स्थापन केले तर आंध्रप्रदेशतील किनारपट्टीवर शिबरम् कॅम्प स्थापन करण्यात आल्या.
- मिठावरील कराला भारतीय राष्ट्रवादी लोकांचा विरोध होता, कारण मीठ ही जीवनावश्यक वस्तु आहे. तसेच मिठावरील कर गरीबालाही द्यावा लागत असे.
- ब्रिटीशांनी 4 मे, 1930 ला गांधींना अटक केले त्याच्या निषेधार्थ गुजरातमधील 300 ग्रामीण सरकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला.

### मिठाच्या यात्रेत सहभागी महिला :-

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | सुचिता कृपलानी | 2. | कमला नेहरु |
| 3. | सरोजिनी नायडू4. | | कमलादेवी चटोपाध्याय |
| 5. | कस्तुरबा गांधी | 6. | लीलावती मुन्शी |
| 7. | हेमा प्रभादास | 8. | हंसाबेन मेहता |

### महाराष्ट्रातील सत्याग्रह :-

- दांडी यात्रेत महाराष्ट्रातील एकुण 13 जणांचा समावेश होता.

1. पंडित खरे
2. गणपतराव गोंडसे
3. विनायकराव
4. केशव गोविंद हरकारे
5. अविंतीकाबाई गोखले
6. जमनलाल बजाज
7. बाबासाहेब खरे
8. द. ना. बांदेकर
9. स.का. पाटील
10. हरिभाऊ मोहानी
11. दत्ताजी ताम्हाणे
12. वासूदेव दास्तेन
13. शामराव पाटील

- **शिरोडा** -येथील सत्याग्रह करण्यापूर्वी इंग्रजांनी शंकर देव, अप्पसाहेब पटवर्धन, वासुदेव दास्ताने, भाऊ रानडे, नाथ घानेघर व केतकर इत्यादींना अटक केली.
- **शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे महाराष्ट्र सविनय कायदेभंगाची समिती स्थापन झाली होती.**
- म्हणुन येथील सत्याग्रहाचे नेतृत्व डॉ. आठल्ये, आचार्य जावडेकर, विनायकराव भुस्कुटे इत्यादींनी केले.
- या सत्याग्रहात 20 जण बेशुद्ध, 40 हुन अधिक जखमी व 300 स्वयंसेवकांना अटक करण्यात आली.
- पुणे जिल्ह्यात मिठाच्या सत्याग्रहाचा प्रचार महर्षी वि.रा. शिंदे, हरिभाऊ तुळपुळे, वासुकाका जोशी, धर्मानंद कोसंबी, केशवराव जेधे इत्यादींनी केले.
- यावेळी कुलाबा (ठाणे प्रांत) येथे जाऊन या सत्याग्रहाबाबत जाहीर प्रचार काकासाहेब गाडगीळ, कामगार नेते एस.एम. जोशी व खांडवीकर यांनी केला.
- **मुंबईतील विले पार्ले येथे 6 एप्रिल 1930 ला सविनय कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात झाली होती.**
- ठाणे जिल्ह्यात उंबरगाव येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व नानासाहेब देवधेकर व कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी केले.
- या प्रकरणात इंग्रजांनी महर्षी वि.स. शिंदे व एस.एम. जोशी यांना 6 महिन्याची शिक्षा केली.
- यावेळी या सत्याग्रहाला शामराव पाटील यांनीहीह सहकार्य केले.
- 25 सप्टेंबर, 1930 रोजी पनवेल जवळील "चिरनेर" या गावात मिठाच्या सत्याग्रहासाठी शेतकऱ्यांनी जो मोर्चा काढला होता त्यात 7 जणांचा बळी गेला.
- या प्रकरणात एकुण 47 सत्याग्रहींवर खटला भरण्यात आला.
- **सातारा जिल्हयातील बिळाशी येथे जंगल सत्याग्रह करण्यात आला होता.**

## बाबु गेणुचे बलिदान - 12 डिसेंबर, 1930

- महाळंगे पडवळ ता. आंबेगाव, जि. पुणे येथील 'बाबू गेणूने' येथील परदेशी कापडाने भरलेल्या ट्रकसमोर आत्मबलीदान केले.
- पूर्ण नाव : बाबू गेनू सैद.
- विधवा आईसोबत राहून तो मोलमजुरी करायचा.
- सत्याग्रहासाठी काँग्रेसचा स्वयंसेवक म्हणून त्यांनी नावनोंदणी केली होती.
- मुंबईतील वळवा देवीच्या नवीन हनुमान रस्त्यावर 12 डिसेंबर, 1930 रोजी 'जॉर्ज फ्रेझर' या व्यापाऱ्याच्या परदेशी कापडाने भरलेल्या ट्रकसमोर तो आडवा झाला व त्यातच त्याचा मृत्यू झाला.
- त्याच्या आत्मबलीदानाने आंदोलन आणखी चिघळले.
- संतप्त जमावाने जी.टी. हॉस्पीटलच्या इमारतीवरील युनियन जॅक जाळला व पोलीसांवर हल्ला केला.
  (गोकुळदास तेजपाल हॉस्पीटल, स्थापना - 1845)
- मुंबईच्या सोनपूर स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.
- आकोला जिल्ह्यातील 'दहीहांडा' या गावी खाऱ्या पाण्याच्या विहिरी होत्या.
- बापूसाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या नेतृत्वाखाली या पाण्यापासून मिठ तयार करुन मिठाचा कायदा तयार करण्यात आला.
- 13 एप्रिल, 1930 नागपूर येथे 'नरकेसरी अभ्यंकर' यांनी जाहीर सभा घेऊन मिठाच्या पुड्यांचा लिलाव केला.
- आसेच कार्य यवतमाळ येथे 'लोकनायक बापूजी अणे' यांनी केले.
- अकोला जिल्ह्यात सत्याग्रहात दुर्गाताई जोशी ही महिला सहभागी होती.
- यावेळी अमरावती येथील सत्याग्रहीचे नेतृत्व डॉ. भोजराज, हरीराव देशपांडे, पाथुरकर, कृष्णराव मोरे इत्यादींनी केले.
- 10 जुलै, 1930 - बापुजी अणे यांच्या नेतृत्वाखाली पुसद जवळच्या आरक्षीत जंगलातील स्वयंसेवकांनी गवत कापुन कायदा मोडला.
- म्हणून या प्रकरणात बापूजी आणेना सहा महिन्याची शिक्षा झाली.
- राजकीय चळवळीच्या माध्यमातून भारतीय महिलांना रस्त्यावर उतरवून गांधीजींनीच प्रथम त्यांना आंदोलन करायला प्रोत्साहन दिले.
- सहभागी स्त्रिया - सुचेता कृपलानी, सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, कमला नेहरु, इत्यादी.

## 1940 - वैयक्तिक सत्याग्रह

- 15 सप्टेंबर, 1940 रोजी मुंबई येथे राष्ट्रीय सभेच्या महासमितीचे अधिवेशन घेण्यात आले आणि त्यात वैयक्तिक सत्याग्रहाच आंदोलन सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- गांधीजींच्या मते, "ब्रिटीश सरकार महायुद्धात गुंतले असताना सामुदायिक सत्याग्रह करणे नैतिकदृष्ट्या योग्य नाही, म्हणून वैयक्तिक सत्याग्रह सुरु केला."
- **सुरुवात :-** 17 ऑक्टोबर, 1940
- **उद्देश :-** शांततामय व अहिंसक मार्गाने जगातील युद्ध विरोधात प्रचार करणे/दुसऱ्या महायुध्दात सामील न होणे.
- **पहिले सत्याग्रही :-** 1. आचार्य विनोबा भावे.
- **दुसरे सत्याग्रही :-** 2. पंडीत नेहरु, 3. ब्रह्मदत्त शर्मा, 4. सरदार वल्लभभाई पटेल, 5. मौलाना आझाद.
- 1940-41 - या एका वर्षात देशभरात 25,000 सत्याग्रहींनी या वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतला.
- गांधींनी याच कालावधीत जपानच्या मालावर बहिष्कार टाकण्याचे आव्हान केले होते.
- **याच कालावधीत चीनचा अध्यक्ष चँग काय शेक यांची भारतभेट. यांनी भारताच्या स्वातंत्र्यकांक्षेला सहानुभूती व्यक्त केली होती.**
- **परिणाम :-**
  1. 1942 - गांधींनी वैयक्तिक सत्याग्रह मागे घेतला.
  **कारण - यावर्षी जापानने इंग्लंडच्या ताब्यातील ब्रह्मदेशची राजधानी रंगून व 'सिंगापूर' हे दोन प्रदेश जिंकुन घेतले.**
- लोकशाहीचे रक्षण व्हावे व जापानकडून इंग्रज हारु नये यासाठी गांधींनी हा सत्याग्रह मागे घेतला.
- **8 ऑगस्ट, 1940 - इंग्रजांनी 'ऑगस्ट क्रांतीची' घोषणा केली.**
- लॉर्ड लिनलिथगो याने ऑगस्ट घोषणा जाहीर केली.
  1. हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी फेटाळली.
  2. हंगामी जनरलच्या कार्यकारी मंडळात काही भारतीयांचा समावेश असेल.
  3. युद्धकाळात सरकारला सहकार्य करण्यासाठी भारतीयांच्या युद्ध सल्लागार मंडळाचे गठण करावे.
- काँग्रेसने ऑगस्ट घोषणा फेटाळून लावली पण जिनांना मात्र आनंद झाला कारण यानंतरच्या कोणताही निर्णय लीगला धरुनच असेल असे सांगण्यात आले.

## 1942 - क्रिप्स योजना

- **पार्श्वभूमी :-**
  जापानने इंग्लंडच्या ताब्यातील 'रंगून व सिंगापूर' हे दोन प्रदेश जिंकुन घेतले. येथूनच इंग्रजांना भारतातील सत्तेबाबत चिंता वाटू लागली.
- म्हणुन इंग्लंडच्या पंतप्रधानाने अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट (एफ.डी.) यांच्याकडे मदत मागितली.
- त्यावेळी एफ.डी. ने या युद्धात भारताची मदत घेण्यासाठी इंग्रजांकडे आग्रह धरला.
- म्हणून भारतासोबत पुढील वाटाघाटीसाठी इंग्लंडच्या पंतप्रधानाने '1942' साली "सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स" यांच्या आध्यक्षतेखाली **"क्रिप्स योजना"** भारतात पाठविली.
- 23 मार्च, 1942 - या दिवशी क्रिप्स मिशन भारतात जाहीर करण्यात आली.
- 25 मार्चपासून भारतात विविध नेत्याशी क्रिप्सने चर्चा केली यात, मौलाना आझाद, जवाहरलाल नेहरु, बॅ. जीना, सावरकर, तेजबहादूर सप्रू, डॉ. बी.आर. आंबेडकर यांचा समावेश होता.
- 30 मार्च, 1942 ला क्रिप्सने आपला अहवाल तयार केला.
- **तरतूदी :-**
  1. भारतात लवकरच संघराज्याची निर्मिती.
  2. या संघराज्यात प्रांतांना व संस्थानिकांना सामील होण्यासाठी स्वयंनिर्णयाचा अधिकार असेल.
  3. भारताला लवकरच वसाहतीचे स्वराज्य देवू.
  4. युद्ध समाप्तीनंतर घटना तयार करण्यासाठी घटना समितीची स्थापना करण्यात येईल.
  5. ज्या प्रातांना व संस्थानिकांना घटना मंजूर नसेल त्यांनी स्वत:ची घटना तयार करावी.
  6. युद्ध चालू असेपर्यंत युद्ध खाते सोडून सर्व खाती भारतीयांकडे असतील.
  7. यासाठी भारताने जापान बरोबरच्या युद्धात इंग्रजांना मदत करावी.

◆ **परिणाम :-**

1. प्रांतांना व संस्थांनिकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार दिल्याने देशात फुट पडण्याची शक्यता होती.
2. युद्धानंतर वसाहतीक स्वराज्य लवकरच देण्याचे आश्वासन दिले होते व भारताची राज्यघटना तयार करण्याचा अधिकार भारतीयांना राहील याला प्रथमच मान्यता दिली.
3. क्रिप्स योजना यशस्वी व्हावी यासाठी अमेरिकन पंतप्रधान फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी कर्नल रुई जॉन्सन या अमेरिकन दुताला दिल्लीत पाठविले होते.
4. 10 एप्रिल, 1942 रोजी काँग्रेसने एक ठराव पास करुन योजना फेटाळून लावली. 12 एप्रिल, 1942 ला क्रिप्स मायदेशी परत आले.

◆ **क्रिप्सबद्दल भारतीयांची मते :-**

1. गांधींचे मत - "क्रिप्स योजना म्हणजे बुडत्या बँकेचा पुढील तारखेचा चेक होय."
2. डॉ. पट्टाबी सितारमय्या यांच्या मते, "क्रिप्स योजना म्हणजे मृतावस्थेत जन्माला आलेले ब्रिटीश मंत्रिमंडळाचे अभ्रक होय."
3. हिंदू महासभेच्याम मते, "ही योजना म्हणजे पाकिस्तानच्या निर्मितीचा जिवंत विषाणू आहे."
4. डॉ. आंबेडकर व शिख नेत्यांनीही या योजनेला विरोध केला.
5. **पं. जवाहरलाल नेहरु यांच्या मते, "क्रिप्स सारखी व्यक्ती ही स्वत:ला सैतानाचा वकिल बनू देते."**
6. या योजनेत "स्वातंत्र पाकिस्तानचा" उल्लेख नसल्याने बॅ. जिना ने ही योजना फेटाळुन लावली.

◆ क्रिप्स योजना भारतात मालवेंद्रनाथ रॉय व त्यांच्या कम्युनिष्ट पक्षाने स्विकारली.

◆ ब्रिटीश पंतप्रधान चर्चिल, भारतमंत्री अमेरी, तत्कालिन व्हॉईसरॉय लिनलिथगो, सरसेनापती वॅव्हेल यांच्या मते, ही योजना यशस्वी होऊ नये असे मत होते.

- **क्रिप्स योजना काँग्रेसने नाकारली. कारण कोणताही राजकीय पक्ष क्रिप्स योजनेबाबत समाधानी नव्हता.**

◆ क्रिप्स मिशन भारतातून गेल्यानंतर राजगोपालचारी यांनी मुस्लीम लिगच्या नेत्यांशी पाकिस्तानची मागणी मान्य करावी असे मत काँग्रेसच्या महासमितीत मांडले, परंतु महासमितीने ते मत फेटाळून लावून शिस्तभंगाची कारवाई केली. म्हणून राजाजींना काँग्रेस कार्यकारीणीचा व काँग्रेस संघटनेचा सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

## 1942 - चले जाव चळवळ / छोडो भारत आंदोलन

◆ **चलेजाव हा शब्द प्रथम युसुफ मेहरअली यांनी वापरला.**

◆ 14 जुलै, 1942 - वर्धा येथील काँग्रेसच्या कार्यकारणीत गांधींनी चलेजाव चळवळीचा ठराव मांडला.

◆ 8 ऑगस्ट, 1942 - मुंबई येथील काँग्रेसच्या अधिवेशनात या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. मौलाना आझाद यांनी या चळवळीचा ठराव पास केला.

◆ स्थळ - गवालियाँ टँक मैदान, मुंबई (ऑगस्ट क्रांती मैदान)

◆ या अधिवेशनात गांधींनी 'करा किंवा मरा' संदेश दिला.

◆ या चळवळीचे नेतृत्व गांधी, नेहरु व मौलाना आझाद यांच्याकडे होते.

### चले जाव चळवळ सुरु होण्याची कारणे :-

◆ क्रिप्स अयशस्वी ठरले.

◆ लोकांमधील असंतोष वाढत होता.

◆ ब्रिटीशांचा पराभव होईल असे भारतीयांना वाटू लागले.

◆ ब्रिटीशांनी मलाया व ब्रह्मदेशातून माघार घेतली.

◆ इंग्रजांना व भारतीयांना जपानच्या अक्रमनाची भिती वाटू लागली.

◆ चले जाव चळवळीचे समाजवादी व सुभाषबाबूंनी स्वागत केले. तर उदारमतवादी गट मुस्लिम लीग, हिंदू महासभा, दलित गट, इत्यादीसह इंग्रजांच्या मजूर पक्षानेती विरोध केला.

◆ या आंदोलनाच्या वेळी 73 वर्षाच्या गांधींनी 2.5 तास भाषण केले.

◆ सरकारी कर्मचारी, सैन्य, विद्यार्थी, संस्थानिक, प्रजा, शेतकरी, जमिनदार इत्यादींना मार्गदर्शन केले.

◆ 9 ऑगस्ट, 1942 सकाळी 9.00 वाजात बिर्ला भवनाला वेढा देऊन काँग्रेसच्या सर्व नेत्यांना अटक करण्यात आली.

◆ **ब्रिटीशांनी या कृतीला ऑपरेशन झिरो ओवर असे नाव दिले.**

◆ काँग्रेसच्या मुख्य नेत्यांना वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आले. गांधींना व सरोजिनी नायडूंना पुण्यातील 'आगा खान पॅलेस' मध्ये तर नेहरु, पटेल, आझाद यांना नगरच्या 'भुईकोट किल्ल्यात' ठेवण्यात आले. **याच कालावधीत विजयालक्ष्मी पंडित (स्वरुपकुमारी) यांनाही तुरुंगवास झाला होता. त्या पं.नेहरु यांच्या भगिणी होत्या. त्यांनी प्रिजेन डेज हा ग्रंथ लिहला आहे. (राज्यसेवा मुख्य 2019)**

- राजेंद्रप्रसाद यांना पटना, तर जयप्रकाश नारायण यांना हजारीबाग येथे ठेवण्यात आले.
- देशातील मोर्चे व भाषणे यावर बंदी घालून वृत्तपत्रावर बंदी घालण्यात आली.
- देशातील एकुण 96 वृत्तपत्रे बंद पडली तर काँग्रेसच्या नॅशनल हेरॉल्ड यावरही बंदी घातली.
- या चळवळीचे नेतृत्व जिल्हा व प्रांत पातळीवरील स्थानिक नेत्यांनी केले.
- इंग्रजांनी त्यांचीही धरपकड सुरु केल्याने जनतेची भुमिगत चळवळीच्या आंदोलनाला सुरुवात केली.

**चलेजाव चळवळ अयशस्वी होण्याची कारणे -**

- ब्रिटीश सरकारपुढे निशस्त्र लोकांचा निभाव लागणे कठीण होते.
- चळवळीपुर्वीच सरकारने गांधीजीना अटक केली.
- सरकारी नोकरीत असलेल्यांनी चळवळीत भाग घेतला नाही.
- मुस्लीम लीगने चळवळीत पाठींबा दिला नव्हता.

## भूमिगत चळवळ/आंदोलन

- **प्रमुख नेते :-**
  1. जयप्रकाश नारायण (जे.पी./लोकनायक)
  2. अच्युतराव पटवर्धन
  3. डॉ. राममनोहर लोहिया
  4. अरुना असफअली (भारतातील पहिली महिला महापौर)
  5. युसुफ मेहरअली
  6. सुचेता कृपलानी (भारतातील पहिली महिला मुख्यमंत्री)
  7. ना.ग. गोरे
  8. कामगार नेते एस.एम. जोशी
  9. उषा मेहता

**चळवळीतील नेत्यांची टोपन नावे :-**

1. कुसुम - अच्युतराव पटवर्धन
2. कदम - अरुणाअसफ अली
3. दादी - सुचिता कृपलानी
4. दिदी - बाबाराव बादाम

**महाराष्ट्रातील भूमीगत नेते -**

- **नाना पाटील**
- **यशवंतराव चव्हाण**

- **कार्य :-**
  1. देशभरातील शाळा महाविद्यालये कारखाने बंद पाडण.
  2. दळणवळण विस्कळीत करुन शासकीय यंत्रणेची मोडतोड करणे.
  3. इंग्रजांची शस्त्रास्त्रे व खजिणा लुटणे.

**यावेळी महाराष्ट्रात पुढील संघटना स्थापन झाल्या :-**

**1. आझाद रस्ता :-**

- ही दशहतवादी संघटना रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात "भाईकोतवाल" यांनी सुरु केली.
- यावेळी नाना पुरोहीत व मोहन धारीया यांनीच रायगड जिल्ह्यातील महाड येथे गांधींची चलेजाव चळवळ कार्यरत केली.
- यावेळी महाड येथील पोस्ट ऑफीस मधील महत्त्वाची कागदपत्रे जाळण्यात आली, तार यंत्रणा तोडण्यात आली व पोलिसांकडील बंदुका काढून घेण्यात आल्या.
- यावेळी टाटाच्या खोपोली विद्युत केंद्रावरुन मुंबईला जाणारा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला.

**2. लाल सेना :-**

- ही संघटना नागपुरच्या 'जनरल आवारी' ने सुरु केली.

**3. काँग्रेस रेडीओ / सिक्रेट रेडियो :-**

- **मुंबई येथे या रेडीओची सुरुवात 'उषा मेहता, विठ्ठल जव्हेरी व चंद्रकांत जव्हेरी' यांनी केली. यांना इंग्रजांनी गुप्त रेडिओ चालविल्याबद्दल अटक केली होती. शिकागो रेडिओ आणि टेलिफोन कंपनीचे मालक नानक मोटवानी यांनी काँग्रेस रेडिओकरीता तंत्रज्ञ आणि उपकरणे पाठवले होते.**
- **उद्देश :-**
  1942 च्या या क्रांतीची प्रेरणा व संदेश भारतभर पसरविणे व सर्वसामान्य जनतेला भुमिगत चळवळीच्या नेत्यांचे कार्य 'रेडियोद्वारे कळविणे.'

**इतर माहिती :-**

- महाराष्ट्रात चलेजाव चळवळीचे प्रमुख केंद्र 'मुंबई' होते.
- यावेळी मुंबई भुमिगत चळवळीच्या नेत्यांनी 'सेंट्रल डिरोक्टरेट' ही मध्यवर्ती संस्था सुरु करण्यात आली.
- या संस्थेतुनच क्रांतीकारकांना शस्त्रस्त्रे व दारुगोळा पुरवठा केला जात असे.
- यावेळी मुंबईतील विद्यार्थ्यांनी शाळा महाविद्यालये बंद पाडण्याबरोबरच मुंबईत अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणला.
- या प्रकरणातील संशयीत म्हणून इंग्रजांनी 'डॉ. वसंत अवसरे' यांना अटक करण्याचा प्रयत्न केला. पण भुमिगत असल्याने ते इंग्रजांच्या हाती आले नाहीत.
- पोलिसांनी मुंबईतील नळबाजारातील इमारतीवर छापा टाकून कामगार नेते एस.एम. जोशी, महादेव कारेकर, मधु लिमये, विनायक कुलकर्णी इत्यादींना अटक केली.
- पुण्यात या आंदोलनावेळी 'वेस्ट एन्ड' व 'कॅपिटल' या दोन चित्रपटगृहात बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आला.

- यावेळी खानदेशात सानेगुरुजींच्या सल्ल्यावरुन लिलाताई पाटील व त्यांचे दीर शिवाजी पाटील आणि दशरथ पाटील हे या चळवळीत सक्रिय झाले.
- यावेळी त्यांनी रेल्वेस्टेशन, पोलिस स्टेशन, न्यायालये, पोस्ट ऑफीस इत्यादींवर मोर्चा काढून ते कार्यालय जाळून टाकेल.
- येथील आंदोलनावेळी 'महादेव देसाई' या आंदोलनकर्त्याचा बळी गेला.
- या प्रकरणात लिलाताई पाटील व दशरथ पाटील यांना एक वर्षाची शिक्षा झाली.
- धुळे व नंदुरबार या रस्त्यावरील 'चिमठाणे' या गावाजवळ क्रांतीकारकांनी 5.50 लाखांचा इंग्रजांचा खजिना लुटला.
- येथील युवकांनी अब्दुल रंजवा यांच्याशी संघनमत करुन रेल्वे उलथून टाकली.
- याचवेळी नंदुरबार येथील शाळेवर भारताचा तिरंगाध्वज फडकविताना 'शिरीषकुमार मेहता' या चिमुड्याने आत्मबलिदान दिले.

**याच बरोबर लालदास, धनसुखलाल, शशीधर, घनश्याम हे शाळकरी विद्यार्थीही हुतात्मा झाले होते.**

**1942 च्या आंदोलनात भूमीगत चळवळीतील आंदोलक 'सुरुंगे' तर महात्मा गांधीजींच्या आदेशान्वे कैद पत्करणारे 'तुरुंगे' म्हणून ओळखले जात होते.**

## प्रतिसरकार / पत्रीसरकार

| | | |
|---|---|---|
| ◆ महाराष्ट्रात | :- | **सातारा व कोल्हापूर (साताऱ्यात भारतातील सर्वात जास्त दिवस प्रतिसरकार चालले होते.)** |
| ◆ आंध्रप्रदेश | :- | भीमावरण |
| ◆ बिहार | :- | भागलपूर व पुर्णिया |
| ◆ उत्तरप्रदेश | :- | बलिया व आझमगढ |
| ◆ बंगाल | :- | मिदनापूर (तुमलुक) (17 डिसेंबर 1942/जातीय सरकार) |
| ◆ ओडिशा | :- | बालासोर |

## महाराष्ट्रातील प्रतिसरकार

1. **सातारा :-** नेतृत्व 'क्रांतिसिंह नाना पाटील' (1 जुन, 1943 ते 13 जुन, 1946)
2. **कोल्हापूर :-** नेतृत्व 'रत्नाप्पा कुंभार'

- साताऱ्यामध्ये नाना पाटील यांना यशवंतराव चव्हाण, किसान वीर, वसंतदादा पाटील, जे.पी. लाड, नागनाथ नाईकवाडे यांनी मदत केली.

**साताऱ्याच्या प्रतिसरकारमध्ये लीलाताई पाटील, विजयाताई लाड, लक्ष्मीबाई नाईकवडी, राजताई पाटील इ. महिलांचा सहभाग होता.**

- 1942 - या आंदोलनात महाराष्ट्रातील आष्टी, चिमुर, यावली, महाड, नगर, पाथर्डी, गारगोटी, नंदुरबार येथील लढे महत्त्वपूर्ण ठरले.
- यावेळी 'ब्रिटिशांना चिमुर' हे गाव उद्धवस्त करण्याचा प्रयत्न केला पण येथील जनतेच्या विरोधामुळे इंग्रजांना यश आले नाही.

**चिमुर येथे बळी पडलेल्या महिलेला डॉ.सौ.वालझकर, विमला अभ्यंकर, रमाबाई तांबे, देवस्कर ताई इ.भेट दिली होती.**

- त्यावेळी 'कोल्हापूर' व 'सांगली' येथील जनतेनी या आंदोलनकर्त्यांना सहकार्य केले.
- यावेळी पोलिस अधिकाऱ्यांनीही इंग्रजांच्या गुप्त सरकारी बातम्या या आंदोलनकर्त्यांना पुरविल्या.
- या चळवळीवेळी इंग्रजांनी 'पुण्यात' केशवराव जेथे, धनंजय गाडगीळ, शंकरराव देव या काँग्रेसच्या नेत्यांना अटक केली.
- त्यांच्या अटकेचा जाहीर निषेध म्हणून पुणेकरांनी काढलेल्या मोर्च्यात पोलिसांनी केलेल्या लाठी हाल्ल्यात 7 जणांचा बळी गेला.
- 1 ऑगस्ट, 1942 रोजी 'हॅमंड' या इंग्रज अधिकाऱ्याने पुण्यातील मोर्चा अडवून गोळीबार केला. त्यात 'नारायण दाभाडे' या युवकाचा मृत्यू झाला.
- नागपूरमध्ये या आंदोलनावेळी नागपूरमध्ये पोलीसांनी केलेल्या गोळीबारात राष्ट्रीय शिवाजी मंडळाचे कार्यकर्ते 'दाजीबा महाले' यांचा मृत्यू झाला.
- त्यानंतर 18 वर्षे वय असलेला त्यांचा मुलगा 'शंकर महाले' यांनी गांधींच्या नावाचा जयजयकार करुन मृत्युला कवटाळले.
- यावेळी 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' व 'सानेगुरुजी' यांच्या गितांनी या आंदोलन कर्त्यांना प्रोत्साहन दिले.

**उदा.**

1. "चलो जवानो अब करके बताओ, कहने के दिन अब बित गये |"
2. "पत्थर सारे बॉंब बनेंगे भक्त बनेगी सेना |"
3. "बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो."
   - साने गुरुजी.

याच कारणासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व साने गुरुजी यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा आरोप लावून अटक करण्यात आली.

- नागपूरच्या आंदोलनावेळी 42 जखमी तर 64 जणांचा बळी गेला.

## राजाजी योजना - 1944

- इंग्रजांनी चलेजाव चळवळी दडपून टाकली.
- 1944 - गांधींची सुटका.
- गांधींना स्वातंत्र्याचा प्रश्न मुस्लीम लीगशी समझोता करुन सोडवायचा होता.

- कारण - मुस्लीम लीगने निश्चित भूप्रदेशासह स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केली होती.
- म्हणुन चक्रवर्ती राजगोपालचारी (राजाजी) यांनी राष्ट्रीय कॉंग्रेस व मुस्लीम लिग यांच्यात तडजोड घडवून आणणारी ही योजना तयार केली तीलाच 'राजाजी योजना' म्हणतात.
- **तरतूदी :-**
  1. घटनानिर्मितीपूर्वी राष्ट्रीय कॉंग्रेस व मुस्लीम लिग यांचे मिळुन केंद्रीय हंगामी सरकार स्थापन करावे.
  2. युद्ध समाप्तीनंतर बहुसंख्य मुस्लीम प्रांतांच्या सिमा निश्चित करण्यात येतील. म्हणजेच भारत व पाक अशी दोन राष्ट्र निर्माण होतील.
  3. त्यानंतर जनतेला भारतात कि पाकिस्तानात राहायचे यासाठी सार्वमत घेण्यात येतील.
  4. या सर्व अटी इंग्रजांनी भारत सोडल्यावर अमलात येतील.
- **परिणाम :-**
  1. राष्ट्रीय कॉंग्रेसने प्रथमच स्वतंत्र मुस्लीम राष्ट्रास मान्यता दिली.
  2. या योजनेने मुस्लीम लीगचे समाधान झाले नाही.
  3. म्हणून राष्ट्रीय कॉंग्रेस व मुस्लीम लीग यांचे या योजनेवर सार्वमत न झाल्याने बॅ. जिनाने ही योजना फेटाळली.

## देसाई-लियाकत अली करार - 1945

- भारतातील सर्व गटाकडून राष्ट्रीय सभेच्या नेत्यांच्या सुटकेची मागणी करण्यात आली.
- या मागणीस इंग्रजांनी नकार दिला.
- हिंदु, मुस्लिम पेचातून मार्ग काढणे हा उद्देश होता.
- ब्रिटीशांवर दबाव आणण्यासाठी गांधींना पुन्हा मुस्लीम लीगचे सहकार्य आवश्यक वाटू लागले.
- म्हणून राष्ट्रीय सभेच्या सेंट्रल असेंब्लीचे नेते भुलाभाई देसाई व मुस्लीम लीगचा नेता नवाबजादा लियाकत अली खान यांनी हंगामी सरकारसाठी जी योजना तयार केली तीलाच 'देसाई-लियाकत अली करार' असे म्हणतात.
- त्यांची ही योजना 1935 च्या भारत सरकारच्या कायद्यावर आधारित होती.
- **तरतुदी :-**
  1. विधीसत्तेबाबत गव्हर्नर जनरलला विशेष अधिकार असु नयेत.
  2. एक कार्यकारी मंडळ स्थापन करुन या मंडळाचे सदस्य राष्ट्रीय कॉंग्रेस व मुस्लीम लीग यांनी नियुक्त केलेले असावेत.
  3. या मंडळात दोन्हीही पक्षांच्या सदस्यांची संख्या समान असेल.
  4. या मंडळात अल्पसंख्यांकाचा विशेषतः दलित व शिखांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल.
  5. तुरुंगातून कॉंग्रेसच्या लोकांना मुक्त करावे.
- **परिणाम :-**

  या योजनेत स्वतंत्र पाकिस्तानचा उल्लेख नसल्याने मुस्लिम लिगच्यावतीने बॅ. जिनानेही योजना फेटाळून लावली.

## वेव्हल योजना - जून, 1945 (शिमला मिशन)

- **तरतूदी :-**
  1. नवीन राजघटना भारतीयांनीच तयार करवी.
  2. व्हाईसरॉय व सरसेनापती ही दोन पदे सोडून इंग्रजांच्या कार्यकारी मंडळातील सर्व पदे भारतीयांकडेच असतील.
  3. यात हिंदू व मुस्लीमांची संख्या समान असेल.
  4. युद्ध संपेपर्यंत युद्धखाते सोडून सर्व खाती भारतीयांकडे असतील.
  5. यासाठी भारताने इंग्रजांना जापान बरोबरच्या युद्धात सहकार्य करावे.
- **परिणाम :-**

  या योजनेत स्वतंत्र पाकिस्तानचा उल्लेख नसल्याने मुस्लिम लिगच्या वतीने बॅ. जीनाने ही योजना फेटाळून लावली.

## त्रिमंत्री योजना (कॅबीनेट मिशन) मार्च 1946

- **पार्श्वभूमी :-**
  1. 1945 - यावर्षी भारतीयांना स्वातंत्र्याची स्वप्ने पडू लागली.
  2. कारण याचवर्षी इंग्लंडमध्ये झालेल्या निवडणुकीत हुजूर पक्षाच्या जागी मजूर पक्ष सत्तेवर आला.
  3. या मजूर पक्षाचा पहिला पंतप्रधान 'क्लेमेंट ॲटली' हा बनला.
  4. 15 मार्च, 1946 - त्याने ब्रिटनच्या संसदेत 1948 पूर्वी भारताला स्वातंत्र देण्याचे घोषित केले.
  5. म्हणून भारतासोबत पुढील वाटाघाटीसाठी त्याच्या मंत्रीमंडळाने तीन मंत्री जे कॅबीनेट दर्जाचे होते त्यांना भारतात पाठवले.

**उदा. 1. सर पॅथिक लॉरेन्स (प्रमुख)**
**2. ए.व्ही. आलेक्झांडर**
**3. सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स**

या तीघांचे शिष्टमंडळ भारतात येवून वेगवेगळ्या पक्षांच्या व संघटनेच्या 472 नेत्यांच्या मुलाखती घेतल्या.

- **शिफारशी :-**

घटना निर्मितीसाठी घटना समितीची स्थापना करावी. व घटना समितीसाठी निवडणुका घ्याव्यात.

- **तरतूद :-**

प्रशासकीय सोईसाठी भारताचे तीन भागात विभाजन करावे.

**1. बहुसंख्य हिंदू प्रांत**

- मध्यप्रांत
- बिहार
- उत्तरप्रदेश
- मुंबई

**2. बहुसंख्यु मुस्लीम प्रांत :-**

1. सिंध,
2. बलुचिस्तान,
3.वायव्य सरहद्द प्रांत

**3. बंगाल :-** ओडिसा प्रांत वेगळा करावा.

या समितीच्या शिफारशीनुसारच भारतात निवडणुका झाल्या, त्यावेळी 296 सदस्यांची समिती अस्तित्वात आली. त्यात 15 नामवंत स्त्रियांचा समावेश होता.

उदा. 1. सरोजिनी नायडू, 2. सुचेता कृपलानी, 3. राजकुमारी अमृता कौर, 4. कमलादेवी चटोप्पाध्याय

- याचवर्षी पं. नेहरुंच्या अध्यक्षतेखाली हगामी सरकारची स्थापना करण्यात आली.

- पहिल्या आंतरिम राष्ट्रीय सरकारची घोषणा 24 ऑगस्ट 1946 रोजी झाली होती, 26 ऑगस्ट 1946 वेव्हेल यांनी मुस्लिम लिगला आंतरिम सरकारमध्ये आणले.

- **9 डिसेंबर, 1946 - घटना समितीचे पहिले अधिवेशन दिल्ली येथे भरले, या अधिवेशनाचे पहिले हंगामी अध्यक्ष - 'डॉ. सच्चिदानंद सिन्हा' हे बनले. (मुस्लिम लिग हजर नव्हती.)**

- 11 डिसेंबर, 1946 - दोनच दिवसांनी घटना समितीचे कायदेशीर अध्यक्ष 'डॉ. राजेंद्र प्रसाद' बनले.

- 29 ऑगस्ट, 1947 - घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष 'डॉ. बी.आर. आंबेडकर' बनले.

- यावेळी मुस्लीम लिगच्या 72 सदस्यांनी घटना समितीच्या कामकाजावर बहिष्कार टाकला व जिनाच्या वतीने ही योजना फेटाळून लावण्यात आली.

घटना समितीमध्ये जम्मू काश्मिरचे प्रतिनिधी म्हणून पंतप्रधान शेख अब्दुला आणि त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तीला स्थान दिले गेले होते. पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या सांगण्यावरुन, परंतू घटना समितीच्या कांही सदस्यांनी याला विरोध केला. **16 ऑगस्ट 1946 मुस्लिम लीग तर्फे प्रत्यक्ष कृतीदिन साजरा करण्यात आला.**

## 1947 - माऊँट बॅटन योजना

- **ओळख :-**

**माऊँट बॅटन हा स्वतंत्र भारताचा पहिला विदेशी गव्हर्नर जनरल होय.**

- **वैशिष्ट्ये :-**

ही योजना 3 जुन 1947 रोजी जाहीर झाली.
5 जुलै 1947 ब्रिटीश पार्लमेंटमध्ये भारतीय स्वातंत्र्याचा कायदा मंजूर.
18 जुलै 1947 ब्रिटीश राजसत्तेची मान्यता मिळाली.

याच योजनेने भारत व पाक अशी नविन दोन राष्ट्र निर्माण झाली.

उदा. 14 ऑगस्ट, 1947 - पाक स्वतंत्र

15 ऑगस्ट, 1947 - भारत स्वतंत्र (**स्वतंत्र भारताचे प्रथम सरकार पंडीत नेहरु यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले होते. सर्व मंत्री काँग्रेसचे सदस्य होते.**)

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर दिल्ली रेडिओ केंद्रावरुन **वंदे मातरम्** हे राष्ट्रगीत गाण्याचा पहिला मान **हिराबाई बडोदेकर** यांना देण्यात आला.

- **तरतुदी :-**

1. इंग्रजांनी भारत सोडल्यावर भारत व पाक अशी दोन नविन राष्ट्र निर्माण व्हावीत.
2. या दोन्ही राष्ट्राने आपापल्या सिमारेषा निश्चित करण्यासाठी एका आयोगाची स्थापना करावी.

**बॉन्ड्री कमिशन -**

- या कमिशनचा अहवाल 12 ऑगस्ट 1947 लाच तयार होता. माऊंटबॅटनने तो स्वातंत्र्य दिवसानंतर जाहीर करण्याचे ठरविले, कारण ब्रिटीशावर त्यांची जबाबदारी पडणार नाही.

3. संस्थानिकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार असेल.

- **परिणाम :-**

1. राष्ट्रीय काँग्रेसने प्रथमच इंग्रजांची ही योजना फेटाळली तर मुस्लीम लिगने ही योजना प्रथमच मान्य केली.
2. कारण या योजनेत स्वतंत्र पाकिस्तानचा उल्लेख होता.

**फाळणी नंतरची परिस्थिती -**

- भारत-पाक फाळणीच्या वेळी गांधी बंगाल प्रांतातील "नौखेली" या गावी हिंदु-मुस्लीम ज्या दंगली उसळल्या होत्या ते थांबवण्यासाठी गेले होते.
- भारतात फाळणीनंतर निर्वासितांना आश्रय देण्यासाठी सर्वात मोठी छावणी कुरुक्षेत्र या ठिकाणी उभारण्यात आली होती.
- 1947 मध्ये पंडित जवाहरलाल नेहरुंनी पहिले काम भारतात सुस्थिरता व सुरक्षितता आणण्याचे ठरवले होते.
- भारतात पाकिस्तानातून स्थलांतरीत झालेल्या निर्वासितांची संख्या 6 दशलक्ष होती.
- फाळणीनंतर भारतातील बऱ्याच तागाच्या व कपडयाच्या/ सुताच्या गिरण्या बंद कराव्या लागल्या. कारण ताग व कापूस पिकवणारे मोठे क्षेत्र पाकिस्तानात गेले होते.
- फाळणीच्या कालावधीत अन्नधान्याची चणचण भारताला भासू लागली. कारण गहू व तांदुळ पिकवणारे मोठे क्षेत्र पाकिस्तानात गेले होते.

## अवांतर माहितीसाठी